cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–३३ | मंगळवार दि.२१ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### नव्या संसदेत भाजपाचा पहिल्यांदाच पराभव !

महिला आरक्षण कायद्यात दुरुस्ती करण्यासाठी आणलेले १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत नामंजूर होणे हे नव्या संसद भवनातील एक महत्त्वपूर्ण आणि राजकीय दृष्ट्या परिणामकारक घडामोड ठरली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारसाठी गेल्या अनेक वर्षांत प्रथमच अशी वेळ आली आहे, जेव्हा त्यांनी मांडलेले घटनादुरुस्ती विधेयक सभागृहात मंजूर होऊ शकले नाही. याचाच अर्थ हा सरकारला मोठा धक्का आहे.


# एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्य सज्ज!

## उपलब्ध पाण्याचे नियोजन व जलसंधारणाची कामे पूर्ण करण्यावर भर द्या–मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

**संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी, प्रभावी अंमलबजावणी आणि समन्वयाच्या माध्यमातून या आपत्तीचे सौम्यीकरण करण्यात यावे. यासाठी सर्व विभागांनी तत्काळ उपाययोजना राबवाव्यात. पाण्याचे सुयोग्य नियोजन, जलसंधारणाच्या कामांना गती आणि जुन्या जलस्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवन यावर भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**

संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली. बैठकीस कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषि, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड.आशिष



जयस्वाल यांच्यासह कृषी, मदत व पुनर्वसन, वित्त, जलसंपदा, जलसंधारण, भारतीय हवामानशास्त्र विभाग, वित्त व नियोजन विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यंदा ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत एल निनोचा सर्वाधिक परिणाम जाणवण्याची शक्यता असून पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मे महिन्यात उष्णतेची तीव्रता तुलनेने कमी राहील, मात्र उष्णतेच्या लाटा अधिक प्रमाणात येण्याची शक्यता वर्तविण्यात आली. दरम्यान, पॉझिटिव्ह 'आयओडी' विकसित झाल्यास एल निनोच्या परिणामांची तीव्रता काही प्रमाणात कमी होऊ शकते, असेही यावेळी सांगण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, २०१५ मध्ये पावसाळा संपल्यानंतर राज्यातील पाणीसाठा केवळ ४५ टक्के होता, मात्र सध्या पावसाळा सुरू होण्यापूर्वीच तितका ◀◀ पान २ वर

### वैरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबवा

पशुधनासाठी चारा टंचाई होऊ नये यासाठी आतापासूनच उपाययोजना करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. एल निनोचा परिणाम इतर राज्यांवरही होण्याची शक्यता असल्याने बाहेरील राज्यांवर अवलंबून न राहता राज्यातच वैरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत. धरणांच्या बॅक वॉटर क्षेत्रात वैरण विकास कार्यक्रम हाती घेण्यात यावा. मोठ्या प्रमाणात पशुधन असणाऱ्या तसेच चारा टंचाई जाणविणाऱ्या सोलापूर, सांगली आणि मराठवाडा या भागांमध्ये चारा उपलब्ध कसा होईल, याकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना दिल्या.

### शेततळे योजनेवर भर द्या – कृषीमंत्री

यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर कृषी विषय प्रभावीपणे हाताळण्यासाठी कृषी विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली असून विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. उद्भवू शकणाऱ्या संभाव्य अडचणींचा पूर्वानुमान करून त्यासाठी आवश्यक तयारी करण्यावर भर देण्यात आला आहे. यंदाच्या पावसातील अनिश्चिततेमुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान होऊ नये, यासाठी शेतकऱ्यांना वेळेवर खतांचा पुरवठा होणे अत्यावश्यक आहे. विशेषतः डीएपी खताचे वितरण नियोजनबद्ध पद्धतीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून त्यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश दिले जाणार आहेत. खते आणि बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी कृषी विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सर्व विक्री केंद्रांची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

## थोडक्यात...

### निदा खानच्या अडचणीत वाढ !

नाशिकः नाशिक येथील टीसीएस कंपनीमध्ये घडलेल्या लैंगिक छळ आणि धार्मिक सक्तीच्या प्रकरणात आरोपी असलेल्या निदा खानला स्थानिक न्यायालयाने सोमवारी अटकेपासून कोणतेही अंतरिम संरक्षण देण्यास नकार दिला. तसेच, न्यायालयाने पोलिसांना तिच्या अर्जावर २७ एप्रिलपर्यंत आपले म्हणणे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या कंपनीच्या घडलेल्या नऊ प्रकरणांचा तपास करणाऱ्या नाशिक पोलिसांच्या विशेष तपास पथकाने महाराष्ट्राच्या विविध भागांत खानचा शोध सुरू केला आहे. खानने शनिवारी नाशिक न्यायालयात धाव घेत अटकपूर्व जामीन आणि अर्जावरील सुनावणी प्रलंबित असेपर्यंत अटकेपासून अंतरिम संरक्षण मिळण्याची मागणी केली होती. यावेळी तिने आपण दोन महिन्यांची गर्भवती असल्याचे कारण नमूद केले होते. सोमवारी सुनावणीदरम्यान, तिचे वकील राहुल कसलीवाल यांनी अंतरिम दिलासा मिळण्यासाठी जोरदार युक्तिवाद केला. हा दिलासा मिळाल्यास न्यायालयाकडून तिच्या मुख्य अर्जावर निर्णय होईपर्यंत तिला अटकेपासून संरक्षण मिळाले असते. तथापि, अतिरिक्त सत्र न्यायाधीश के.जी. जोशी यांनी अंतरिम मागणीवर कोणताही आदेश दिला नाही. उलट, त्यांनी पोलीस आणि तक्रारदाराला खानच्या अर्जावर आपले म्हणणे दाखल करण्याचे निर्देश दिले आणि या प्रकरणाची पुढील सुनावणी २७ एप्रिल रोजी निश्चित केली.

### ट्रम्पचा धोकादायक विचार? पोस्टने वाढवली चिंता

वॉशिंग्टनः इराणसोबत वाढता तणाव आणि बॅकचॅनल चर्चेच्या चर्चांदरम्यान व्हाईट हाऊसच्या एका पोस्टने राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. अमेरिकेकडून जारी करण्यात आलेला हा संदेश केवळ एक मोटिव्हेशनल लाईन नसून इराणबरोबर संघर्ष कयम असतानाच केली गेल्याने याला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. सोमवारी व्हाईट हाऊसने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा एक फोटो शेअर करत लिहिले की, ''लॉक्ड–इन मोडः ॲक्टिव्हेटेड, नो एक्सक्यूज, जस्ट विन'' अशा तणावपूर्ण काळात व्हाईट हाऊसच्या या पोस्टने एकाच वेळी अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. इराण चर्चेच्या वाटेवर आपली भूमिका स्पष्ट करत नसेल, तर अमेरिका काहीतरी मोठे पाऊल उचलणार आहे का? ट्रम्प तेहरानमध्ये काही मोठी कारवाई करणार आहेत का? इतकेच नाही तर इराणला चर्चेच्या टेबलावर आणण्यासाठी अमेरिकेचा हा शेवटचा इशारा (अल्टिमेटम) आहे का? असे प्रश्नही या पोस्टमुळे विचारले जात आहेत.

### महिला आरक्षणावर खुल्या चर्चेस काँग्रेस तयार

मुंबईः महिला आरक्षणाच्या नावाखाली भाजपाला मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करून देशाचे तुकडे पाडायचे होते. सत्तेसाठी भाजपा कोणत्याही थराला जाऊ शकते पण त्यांचा कुटील डाव काँग्रेससह सर्व विरोधकांनी हाणून पाडला असून सरकार पूर्णपणे बॅकफूटवर गेले आहे, असे स्पष्ट करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या खुल्या चर्चेला काँग्रेस तयार आहे, कधी व कुठे यायचे ते सांगा, नरेंद्र मोदींनाही चर्चेला आणा, असे प्रतिआव्हान काँग्रेस कार्य समितीच्या सदस्या खासदार प्रणिती शिंदे यांनी दिले. टिळक भवन येथे झालेल्या विशेष पत्रकार परिषदेला काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सदस्या खासदार प्रणिती शिंदे व खासदार शोभाताई बच्छाव यांनी संबोधित केले.

# अमेरिका–इराण चर्चेत पाकिस्तान शांतिदूत

## मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणावर काँग्रेसची टीका

दिल्ली । वृत्तसंस्था

अमेरिका–इराण यांच्यात चर्चा घडवून आणण्यात पाकिस्तान मध्यस्थी करत असल्याच्या मुद्द्यावरून काँग्रेसने सोमवारी (दि. २० एप्रिल) भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. या घडामोडी म्हणजे मोदींच्या परराष्ट्र धोरणासाठी एक मोठा धक्का असल्याचा दावा काँग्रेसने केला आहे.

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी पाकिस्तानचा दलाल देश म्हणून उल्लेख केला. या त्यांच्या शब्दांचा संदर्भ देत काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी



एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे, मोठे जाणकार आणि नेहमी स्टायलिश कपड्यांमध्ये असणाऱ्या परराष्ट्रमंत्र्यांनी ज्याला 'दलाल' देश म्हणून संबोधले होते, तोच देश आज अमेरिका–इराण यांच्यातील शांतता चर्चेच्या दुसऱ्या फेरीचे आयोजन करत असल्याचे वृत्त आहे. हा मोदींच्या परराष्ट्र धोरणासाठी एक प्रचंड मोठा धक्का मानला जात आहे. भारताला आपल्या राजनैतिक संवाद रणनिती आणि कार्यपद्धतीत व्यापक बदल करण्याची गरज आहे आणि त्यासाठी पीएम मोदी सक्षम नाहीत, असे त्यांनी पुढे म्हटले आहे. १२ एप्रिल रोजी चर्चेची पहिली फेरी पूर्ण झाल्यानंतर, पाकिस्तानने सौदी अरेबिया आणि कतारकडून ६ अब्ज डॉलर्सचे कर्ज घेतले. जेणेकरुन पाकिस्तानने संयुक्त अरब अमिराती यांच्याकडून घेतलेले ३.५ अब्ज डॉलर्स कर्ज फेडता येईल आणि १.४३ अब्ज डॉलर्सच्या युरोबॉन्डचा एक हप्ता भरता येईल. यावरुन पाकिस्तानची अर्थव्यवस्था स्पष्टपणे डबघाईला आली असल्याचे दिसते. तो मित्र देशांकडून मिळणाऱ्या मदतीवर अवलंबून आहे. त्याने ओसामा बिन लादेन आणि इतर दहशतवाद्यांना आश्रय दिला, त्याने ◀◀ पान २ वर

# परळीत अजित पवार गटाच्या नेत्यावर हल्ला

परळी । प्रतिनिधी

**तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नेते आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती संजय जाधव यांच्यावर रात्री उशिरा ५ ते ६ अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला केला. त्यांच्यावर कोयत्याने सपासप वार करून जीवघेणा प्रकार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या भीषण हल्ल्यात संजय जाधव हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.**

या प्रकरणी मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, रविवारी रात्री साडे अकरा वाजेच्या सुमारास संजय जाधव हे गोवर्धन हिवरा ते सिरसाळा रोडवर असलेल्या आपल्या शेताकडून घराकडे नेहमीप्रमाणे जात होते. ते गोवर्धन शिवारात आले असता, दबा धरून बसलेल्या ५ ते ६ अज्ञात इसमांनी त्यांना अचानक अडवून त्यांच्यावर हल्ला चढवला. हल्लेखोरांनी कोयत्यासारख्या धारदार शस्त्राने जाधव यांच्यावर सपासप वार करत त्यांना गंभीर जखमी केले या हल्ल्यात संजय जाधव हे रक्ताच्या थारोळ्यात जागेवरच कोसळले. परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी जाधव यांना तत्काळ उपचारासाठी ◀◀ पान २ वर

### जुन्या वादातून हल्ला?

काही दिवसांपूर्वीच संजय जाधव यांनी गावातील एका तरुणाला मारहाण केल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. या पार्श्वभूमीवर, हा हल्ला त्याच वादातून झाला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे.

# जम्मू–काश्मीरमध्ये बस दरीत कोसळली; २१ ठार

श्रीनगर । वृत्तसंस्था

जम्मू–काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यात सोमवारी (दि.२०) सकाळी भीषण बस अपघात झाला. रामनगरहून येणारी बस कगोत जवळ रस्त्यावरून सुमारे १०० फूट खाली कोसळून उलटली. या अपघातात २१ जणांचा मृत्यू झाला असून २९ हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत.

जखमी प्रवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, बसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी होते आणि तिचा वेगही खूप जास्त होता. कगोत नाल्याजवळ अचानक बसचे टायर फुटले. यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस थेट दरीत कोसळली. या भीषण अपघातात बसच्या वरच्या भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. ◀◀ पान २ वर

# गुणरत्न सदावर्तेंचा रिक्षाचालकांच्या मराठी भाषा सक्तीला विरोध; आयुक्तांना निवेदन

मुंबई । वृतसंस्था

राजधानी मुंबईत मराठीसाठी शिवसेना आणि मनसे कायमच आग्रही असते, शिवसेनेत फूट पडल्यानंतरही दोन्ही शिवसेनेची मराठीसाठी तीच भूमिका पाहायला मिळते. त्यातच, मराठी लिहिता वाचता येत नसेल त्या रिक्षा टॅक्सी चालकांचे परवाने रद्द करण्यात येणार असल्याचा मोठा निर्णय राज्याचे परिवहन मंत्री तथा शिवसेना नेते प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. विशेष




म्हणजे, येत्या १ मे म्हणजेच महाराष्ट्र दिनाच्या दिवसापासून ही कारवाई केली जाणार आहे, असे आदेश देखील परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. मात्र, निर्णयाला रिक्षा टॅक्सी चालक मालक संघटना आणि संयुक्त कृती समिती अध्यक्ष शशांक राव यांनी तीव्र विरोध केला असून आता ॲड. गुणरत्न सदावर्ते हेही मैदानात उतरल्याचे दिसून येत आहे.

गुणरत्न सदावर्ते यांनी आपल्या ◀◀ पान २ वर

# पुस्तक आणि गणवेश खरेदीचा दबाव टाकल्यास शाळांवर होणार कारवाई

मुंबई । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, पुस्तके किंवा इतर शैक्षणिक साहित्य ठरावीक दुकानातूनच खरेदी करण्याची सक्ती करणा–या शाळांवर आता कारवाई होणार आहे. राज्यातील सर्व खासगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना अशा सक्तीपासून दूर राहण्याचे स्पष्ट निर्देश प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. या निर्णयामुळे पालकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.



राज्यातील सर्व खासगी शाळा शैक्षणिक साहित्य आणि गणवेश ठरावीक दुकानातून खरेदी करा, असे पालकांना सांगतात. याबाबत अनेक पालकांनी, पालक संघटनांनी आणि ग्लोबल पेरेंट्स टीचर्स असोसिएशनने शिक्षण विभागाला तक्रारी केल्या होत्या.याबाबत ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२० एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः २०९.५० क्विंटल | २,१०० | २,५८१ | २,२८७ |
| ज्वारी/हायब्रिड : २१२.०० क्विंटल | १,५२० | ३,५७१ | २,२९८ |
| मका/लोकलः ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ६.०० क्विंटल | ७,४०१ | ७,४०१ | ७,४०१ |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरीः १६७.५० क्विंटल | २,१०१ | २,६१० | २,३२२ |
| मुगः २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीनः १३६.५० क्विंटल | ५,५०० | ५,५११ | ५,५०५ |
| हरभराः ९.५० क्विंटल | ५,२५१ | ५,२५१ | ५,२५१ |

# नेताजी सुभाषचंद्र बोस यांना राष्ट्रपुत्र घोषित करा

## सरन्यायाधीश सूर्यकांत याचिकाकर्त्यावर भडकले ; म्हणाले, सुप्रीम कोर्टात तुमची एंट्रीच बंद करू

नवी दिल्ली । वृतसंस्था

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे क्रांतिकारी नेते नेताजी सुभाषचंद्र बोस यांना राष्ट्रपुत्र घोषित करण्यात यावे, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. या याचिकेत नेताजींच्या आझाद हिंद फौज या संघटनेला भारताच्या स्वातंत्र्याचे अधिकृत श्रेय देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली होती. ही याचिका दाखल करणाऱ्या वकिलाला सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी चांगलेच धारेवर धरत ''सर्वोच्च न्यायालयात



तुमचा प्रवेशच बंद करू,'' असा इशाराही दिला.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अधिकृतरीत्या राष्ट्रपुत्र घोषित करण्यात यावे आणि आझाद हिंद फौजेमुळेच देशाला स्वातंत्र्य मिळाले, हे अधिकृतरीत्या स्वीकारण्यात यावे, अशा दोन प्रमुख मागण्या वकील व याचिकाकर्ते पी. मोहंती यांनी आपल्या याचिकेत केल्या होत्या. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी याचिकाकर्ते पी. मोहंती यांना सुनावले की, ''तुम्ही न्यायालयाचा वेळ वाया घालवत आहात. तुम्ही नेहमीच अशी कामे केली आहेत. यापूर्वीही तुमच्याकडून अशाच प्रकारच्या याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. जर तुमच्या वर्तनात सुधारणा झाली नाही, तर आम्ही सर्वोच्च न्यायालयात तुमच्या प्रवेशावरच बंदी घालू.'' जेव्हा सरन्यायाधीशांनी जुन्या याचिकांचा संदर्भ दिला, तेव्हा याचिकाकर्त्याने ''ही याचिका वेगळी आहे,'' असे सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावर खंडपीठाने ''या याचिकेचा मसुदा कोणी तयार केला?'' अशी विचारणा केली. मोहंती यांनी मुखर्जी सर यांनी ही याचिका तयार केल्याचे सांगताच न्यायालयाने त्यावरही तीव्र ◀◀ पान २ वर

# लातूरमध्ये सात वर्षांच्या चिमुरड्याची सख्ख्या काकूनेच केली हत्या

लातूर । प्रतिनिधी

चाकूर परिसरात खळबळ उडवून देणाऱ्या सात वर्षीय देवांश मंगेश स्वामी याच्या खून प्रकरणाचा लातूर पोलिसांनी अवघ्या काही तासांत यशस्वी उलगडा केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, आपल्या पतीला आणि त्याच्या कथित प्रेयसीला धडा शिकवण्यासाठी सख्ख्या काकूनेच या निरागस बालकाचा बळी घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी आरोपी अनिता दिनेश स्वामी हिला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. १९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास देवांश आणि त्याचा चुलत भाऊ घराबाहेर खेळायला गेले होते. मात्र, बराच वेळ झाला तरी ते परतले नाहीत. दुपारी १ वाजता वडील मंगेश स्वामी यांनी चाकूर पोलीस ठाण्यात मुले हरवल्याची तक्रार दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# नव्या संसदेत भाजपाचा पहिल्यांदाच पराभव !

महिला आरक्षण कायद्यात दुरुस्ती करण्यासाठी आणलेले १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत नामंजूर होणे हे नव्या संसद भवनातील एक महत्त्वपूर्ण आणि राजकीय दृष्ट्या परिणामकारक घडामोड ठरली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारसाठी गेल्या अनेक वर्षांत प्रथमच अशी वेळ आली आहे, जेव्हा त्यांनी मांडलेले घटनादुरुस्ती विधेयक सभागृहात मंजूर होऊ शकले नाही. याचाच अर्थ हा सरकारला मोठा धक्का आहे. दोन दिवस चाललेल्या चर्चेनंतर झालेल्या मतदानात विधेयकाच्या समर्थनार्थ २९८ मते पडली, तर विरोधात २३० मते पडली. मात्र घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेले दोन-तृतीयांश बहुमत सरकारला मिळवता आले नाही. परिणामी, हे विधेयक कोसळले आणि त्यासोबत जोडलेले डिलिमिटेशन व केंद्रशासित प्रदेश कायद्यातील दुरुस्तीचे प्रस्तावही आपोआप बाद झाले.

या संपूर्ण प्रक्रियेत सर्वात महत्त्वाचा मुद्दा ठरला तो म्हणजे महिला आरक्षण आणि डिलिमिटेशन या दोन भिन्न स्वरूपाच्या विषयांना एकत्र जोडणे. महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा मुद्दा स्वतंत्रपणे व्यापक समर्थन मिळवू शकला असता; मात्र त्याला लोकसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेशी जोडल्याने विरोधकांना आक्षेप घेण्याची संधी मिळाली. डिलिमिटेशन म्हणजे लोकसंख्येच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना. सरकारच्या प्रस्तावानुसार भविष्यात लोकसभेच्या जागांची संख्या वाढवून ८१६ करण्याचा विचार मांडण्यात आला होता. यामुळे सर्व राज्यांमध्ये जागांची संख्या वाढेल, असे आश्वासन देण्यात आले. परंतु दक्षिण भारतातील राज्यांनी यावर तीव्र आक्षेप घेतला. त्यांना वाटते की लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी ठरलेल्या राज्यांना या प्रक्रियेमुळे राजकीय प्रतिनिधित्वात नुकसान सहन करावे लागू शकते. या पार्श्वभूमीवर एम.के. स्टॅलिन यांनी डिलिमिटेशनविरोधात स्पष्ट भूमिका घेतली. दक्षिणेकडील राज्यांचा आवाज दुर्लक्षित केला जात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे या विधेयकाला केवळ कायदेशीर नव्हे तर संघराज्यीय संतुलनाच्या दृष्टिकोनातूनही विरोध वाढला. विरोधकांनी महिला आरक्षणाला समर्थन दर्शवतानाच त्याला डिलिमिटेशनशी जोडण्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रियंका गांधी यांनी हा मुद्दा लोकशाहीच्या मूलभूत रचनेशी संबंधित असल्याचे सांगितले, तर कार्ति चिदंबरम यांनी दक्षिण राज्यांच्या हक्कांवर गदा आणण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप केला. अखिलेश यादव यांनीही विरोधकांनी आखलेल्या राजकीय मर्यादांमुळे सरकारला मागे हटावे लागल्याचे म्हटले. दुसरीकडे, सरकारने या विधेयकाचे समर्थन करताना ते महिलांच्या सक्षमीकरणासाठी ऐतिहासिक पाऊल असल्याचे अधोरेखित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे विधेयक देशाच्या भविष्यासाठी निर्णायक असल्याचे म्हटले, तर अमित शाह यांनी याला ''नारीशक्ती सशक्तीकरणाची दिशा'' असे संबोधले. सरकारचा युक्तिवाद असा होता की, महिला आरक्षणाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी डिलिमिटेशन आवश्यक आहे. मात्र विरोधकांच्या दृष्टीने हा मुद्दा केवळ महिला सक्षमीकरणाचा नव्हता, तर त्यामागील राजकीय गणिताचा होता. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे विधेयक आणण्यात आले, असा आरोप करण्यात आला. विशेषत: काही राज्यांमध्ये निवडणूक प्रक्रिया सुरु असताना संसदेत विशेष अधिवेशन बोलावण्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. महिला आरक्षण कायदा २०२३ मध्येच मंजूर झाला होता. त्यामुळे नव्याने दुरुस्ती विधेयक आणण्याची गरज का भासली, हा प्रश्नही उपस्थित झाला. सरकारने या संदर्भात अधिसूचना जारी करताना तांत्रिक बाबींचे स्पष्टीकरण दिले असले, तरी या प्रक्रियेने राजकीय संशय अधिकच गडद केला. या विधेयकाच्या पराभवामुळे सरकारला राजकीयदृष्ट्या धक्का बसला आहे, हे स्पष्ट आहे. कारण घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी केवळ सत्ताधारी पक्षाचे संख्याबळ पुरेसे नसते; त्यासाठी व्यापक सहमती आवश्यक असते. या प्रकरणात ती निर्माण करण्यात सरकार अपयशी ठरले. तथापि, या पराभवाचे राजकीय परिणाम केवळ संसदेपुरते मर्यादित राहणार नाहीत. सत्ताधारी पक्ष या मुद्याचा वापर करून विरोधकांवर महिलाविरोधी असल्याचा आरोप करू शकतो, तर विरोधक सरकारच्या हेतूंवर प्रश्न उपस्थित करत राहतील. त्यामुळे महिला आरक्षणाचा मुद्दा आगामी निवडणुकांमध्येही केंद्रस्थानी राहण्याची शक्यता आहे. एकूणच, नव्या संसद भवनात घडलेली ही घटना केवळ एका विधेयकाच्या अपयशापुरती मर्यादित नाही. ती देशातील राजकीय समीकरणे, संघराज्यीय समतोल आणि महिलांच्या प्रतिनिधित्वाच्या प्रश्नांना नव्याने अधोरेखित करणारी ठरली आहे. या पार्श्वभूमीवर पुढील काळात महिला आरक्षण आणि डिलिमिटेशन या दोन्ही मुद्यांवर अधिक व्यापक होणे अपरिहार्य ठरेल.

# वनविभागाच्या निष्काळजीपणामुळे वनक्षेत्रातील पर्यावरणीयची हानी-आ.लोणीकर

## दोनशे एकरची आग विजवण्यासाठी दोनच कर्मचारी आरामात पोहोचले



**जालना । प्रतिनिधी**

**जालना तालुक्यातील शंभू सावरगाव, ढगी, काकडा आणि मोहाडी या गावांच्या शिवारातील वनक्षेत्रात लागलेल्या भीषण आगीत २०० एकरांहून अधिक जंगल जळून खाक झाले असून २ लाखांपेक्षा अधिक झाडांचे मोठे नुकसान झाल्याचा गंभीर आरोप आमदार बबनराव लोणीकर यांनी केला आहे. त्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असता प्रशासनाने दिलेल्या आकडेवारीत आणि प्रत्यक्ष स्थितीत मोठी तफावत आढळल्याचे सांगितले. सुरुवातीला सुमारे १५० एकर क्षेत्र जळाल्याची माहिती देण्यात आली होती, मात्र प्रत्यक्षात नुकसान यापेक्षा अधिक असल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसेच आगीची माहिती वनविभागाकडे वेळेत पोहोचली नसल्याने आणि अधिकाऱ्यांनी तत्काळ प्रतिसाद न दिल्याने ही आग नियंत्रणाबाहेर गेल्याचा आरोपही त्यांनी केला. शनिवारी रात्री त्यांनी स्वत: अधिकाऱ्यांना माहिती दिल्यानंतरही प्रशासन दुसऱ्या दिवशी सकाळी घटनास्थळी पोहोचले, ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे आ. लोणीकर यांनी नमूद केले.**

या आगीत सागवान, कडुलिंब, पळस, वड, पिंपळ, आंबा यांसारख्या मौल्यवान वृक्षांसह मोठ्या प्रमाणात वनसंपत्ती नष्ट झाली असून वन्यजीवांचे अधिवासही उद्ध्वस्त झाले आहेत. त्यामुळे ही केवळ आग नसून मोठी पर्यावरणीय आपत्ती असल्याची भावना व्यक्त होत आहे. वनविभागात मोठ्या संख्येने अधिकारी-कर्मचारी असतानाही केवळ दोनच कर्मचारी आग विझवण्यासाठी उपस्थित होते, ही बाब प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे उदाहरण असल्याचे लोणीकर यांनी सांगितले. याशिवाय सुरुवातीला केवळ तीन गावांचा उल्लेख करण्यात आला असताना प्रत्यक्ष पाहणीत मोहाडी गावाचाही मोठ्या प्रमाणात आगीत समावेश असल्याचे उघड झाल्याने माहिती लपवण्याचा आरोप आमदार बबनराव लोणीकर यांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशी, निलंबन तसेच फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करत लोणीकर यांनी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे तक्रार केली आहे. इतक्या मोठ्या घटनेबाबत उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना माहिती नसणे ही बाबही गंभीर असल्याचे त्यांनी नमूद केले. सध्या उर्वरित वनक्षेत्र वाचवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज असून अन्यथा नुकसान आणखी वाढण्याची भीती आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केली आहे. मंठा येथे औद्योगिक वसाहतीसाठी हालचाली वेगात; आमदार बबनराव लोणीकर यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना तातडीच्या कारवाईच्या सूचना मंठा तालुक्यातील मौजे उमरखेडा येथे प्रस्तावित औद्योगिक वसाहतीच्या उभारणीसाठी प्रक्रिया वेगाने सुरू करण्याच्या दृष्टीने आमदार बबनराव लोणीकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी संबंधित पत्राच्या अनुषंगाने तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. उमरखेडा येथील गट क्रमांक १, ८ व ९ मधील सुमारे २९.४३ हेक्टर अतिक्रमणमुक्त जमिनीवर औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. यापूर्वी उद्योग मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या ठिकाणी औद्योगिक वसाहत स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले होते. सदर प्रस्ताव पुढे नेण्यासाठी संबंधित जमिनीचे जिरायत दरानुसार मुल्यांकन करून भूसंपादन प्रक्रिया सुरू करणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. यासाठीच आमदार लोणीकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करत प्रक्रिया गतीमान करण्यावर भर दिला. या औद्योगिक वसाहतीमुळे मंठा तालुक्यात उद्योगांना चालना मिळून स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बांधकाम कामगारांच्या प्रश्नांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर इंटकचे आंदोलन सुरू

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याच्या निषेधार्थ राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक)च्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन छेडण्यात आले. हे आंदोलन आज दि. २० एप्रिल २०२६ सोमवार रोजी सकाळी ११.३० वाजल्यापासून सुरू झाले आहे.**




कामगारांच्या विविध तक्रारींसंदर्भात यापूर्वी प्रशासनाला निवेदन देऊन तात्काळ चौकशी व कारवाईची मागणी करण्यात आली होती. मात्र, कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने कामगारांमध्ये संताप निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर इंटकच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने बांधकाम कामगार आंदोलनात सहभागी झाले आहेत. आंदोलनादरम्यान प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करण्यात येत असून, संबंधित दोषींवर तात्काळ कारवाई करावी, कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करावे, अशा मागण्या करण्यात येत आहेत. दरम्यान, संबंधित प्रकरणाची योग्य ती दखल घेऊन कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्यात येणार असल्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. तसेच, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. यावेळी इंटकचे जिल्हाध्यक्ष रामधन रानबा जमाले, जिल्हा सचिव सखाराम बेंगडे, बीड तालुका उपाध्यक्ष सद्दाम शेख, भीमराव कुठे, शेख युनूस, हनुमान युवक काँग्रेस बीड विधानसभा अध्यक्ष, पठाण रफिक, किसकिंदा ताई पांचाळ, सामाजिक कार्यकर्त्या, सीताताई भोसले, बाळासाहेब मोरे पाटील प्रदेशाध्यक्ष शिवशक्ती भीमशक्ती, वीर कैलास, जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे , शिवाजी कोठुळे, इत्यादी विविध संघटनेचे सामाजिक चळवळीतील सहकारी उपस्थित होते. तरी प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून कामगारांना न्याय द्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.



# अंबड तालुका महसूल संघटनेचा आज बेमुदत संप

**अंबड । प्रतिनिधी**

**२१ एप्रिल २०२६ पासून सुरु होणाऱ्या बेमुदत संप करण्यात आला आहे. असे निवेदन तहसीलदार विजय चव्हाण यांना देण्यात आले आहे.**

राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी दि. २१ एप्रिल २०२६ पासुन बेमुदत संप पुकारलेला आहे. महाराष्ट्र राज्य तलाठी / मंडळ अधिकारी संघटना, महसुल कर्मचारी संघटना, महसुल सेवक संघटना शाखा अंबड ही राज्य सरकारी कर्मचारी संघटनेशी संलग्न आहे. करीता महाराष्ट्र राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेने दि. २१ एप्रिल २०२६ पासून पुकारलेल्या बेमुदत संपात महाराष्ट्र राज्य तलाठी / मंडळ अधिकारी संघटना, महसुल कर्मचारी संघटना, महसुल सेवक संघटना शाखा अंबड चे सर्व सभासद संपात सहभागी असणार आहे. महसूल कर्मचारी संघटनेचे सचिव काशिनाथ घोघ्सीकर, महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष विलास कोमटवार, श्री मिसाळ, संजय गांधी विभागाचे संदीप इंगळे, रमेश वालेकर, आर आर संत्रे, श्री निर्मळ, रशिदा बेग, कल्पना कारके, डी डी काळे, आर एन चव्हाण . यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी निवेदन देण्यात आले आहे.

# डोकेवाडा हरिनाम सप्ताहाची सांगता!

## महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराजांचे आशीर्वाद सदैव बहुजनांच्या पाठीशी राजेंद्र मस्के



**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राच्या समृद्ध संतपरंपरेचा वारसा जपत गावोगावी अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. संत परंपरे नुसार नामस्मरण आणि ज्ञान भक्तीचा आनंद प्रत्येक अनुयायी घेतो. भागवत धर्माचा हा जागर समाजात भक्ती, समता आणि मानवतेचा संदेश रुजवतो. ''राम कृष्ण हरी'' नाम गजरातून सर्वजण एकत्र येत समतेचा मूलमंत्र दृढ होतो, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले.**

श्रीक्षेत्र नारायण गडाच्या मा माध्यमातून महंत शिवाजी महाराज यांचे अध्यात्मिक मार्गदर्शन व संस्काराचे पुण्य कर्म अविरतपणे चालू आहे. त्यांच्या कार्यामुळे लोकांना दिलासा मिळतो. त्यांचे कार्य आणि आशीर्वाद सदैव बहुजनांच्या पाठीशी आहेत असा विश्वास यावेळी राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केला. वार्षिक परंपरेनुसार श्री क्षेत्र नारायण गडाचे महंत हभप शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शना खालील मौ.डोकेवाडा, वाळेकरवाडा-कदमवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता प्रेममुर्ती शिवाजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत हभप गवते महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाली. याप्रसंगी श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थांनचे हभप तुकाराम महाराज भारती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री राजेंद्रजी मस्के, प्रा. निवृत्ती डोके यांनी उपस्थित राहून अध्यात्मिक सोहळ्याचा आनंद घेतला व उपस्थित भाविक भक्तांची संवाद साधला. समस्त ग्रामस्थांच्या वतीनेसुग्रीव डोके, बाबुराव डोके, पोलीस बापू डोके, आसाराम डोके, महादेव कदम, आदी युवा कार्यकर्त्यांनी अखंड सात दिवस उत्तम नियोजन करून हा अखंड हरिनाम सप्ताह संपन्न केला. पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी सांगता प्रसंगी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला.

# पान १ वरून...

पान १ वरून...

### एल निनोच्या पार्श्वभूमीवर

साठा उपलब्ध आहे. त्यामुळे योग्य नियोजन केल्यास राज्याला या परिस्थितीचा सक्षमपणे सामना करता येईल. २०१५ मधील एल निनोच्या कालावधीतील अनुभवावरून २०१८ या वर्षी उपाययोजना केल्यामुळे पिके वाचविता आली. एल निनोच्या कालावधीत पावसातील अनियमिततेमुळे विशेषतः मराठवाड्यात मोठा परिणाम दिसून आला होता. दोन पावसाच्या सरींमध्ये दीर्घ खंड पडल्यास पिकांवर ताण येतो, मात्र संरक्षित सिंचनाच्या माध्यमातून पिकांचे नुकसान कमी करता येते. त्यामुळे जलसंधारण व पाणी साठवण क्षमतेत वाढ करणे अत्यावश्यक आहे. पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यासाठी जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार या योजनांची कामे तातडीने आणि मोठ्या प्रमाणात पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. या कामांसाठी वित्त विभागाने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच जुन्या जल स्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवनाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे. यामुळे कमी पैशात जास्त पाणी साठा उपलब्ध होईल. कमी पावसाच्या परिस्थितीतही सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणारी हीच साधने प्रभावी ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. 'जी रामजी योजने'तून होणारी जलयुक्त शिवारची कामे योग्य प्रकारे झाली आहेत की नाही, यावर लक्ष ठेवण्यासाठी तसेच जी रामजी मधून जास्तीत जास्त कामे मिळविण्यासाठी टास्क फोर्स तयार करावा, असेही यावेळी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील पर्जन्यमान ९० टक्क्यांपेक्षा कमी राहिल्यास पिण्याच्या पाण्यासह शेतीवर मोठा परिणाम होतो. अशा परिस्थितीत नुकसान कमी करण्यासाठी पूर्वतयारी करण्यात यावीत. मनरेगा योजनेअंतर्गत जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देऊन उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करण्याचेही निर्देश त्यांनी यावेळी दिले. तसेच पिण्याच्या पाण्याबाबत केवळ चालू वर्षाचा नव्हे, तर पुढील उन्हाळ्याचाही विचार करून नियोजन कराव्यात. पावसातील संभाव्य घट लक्षात घेऊन पाणी साठवून ठेवणे आणि त्याचा काटेकोर वापर करणे आवश्यक असल्याचे अधोरेखित केले. मुख्यमंत्री फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, पाणी बचतीसाठी आणि इतर पूरक उपाययोजनांसाठी प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक स्तरावर टास्क फोर्स स्थापन करण्यात यावे. जिल्हाधिकारी, सिंचन विभागाचे अधिकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी यांच्या समन्वयातून पाण्याचा काटेकोर वापर आणि साठवणूक सुनिश्चित केली जावी, असे निर्देश यावेळी दिले.

---------

### परळीत अजित पवार

दवाखान्यात दाखल करण्यात आले आल्याचे सांगण्यात आले आहे. बाजार समितीच्या माजी पदाधिकाऱ्यावर असा हल्ला झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे पहावयास मिळत आहे.

-------------

### अमेरिका-इराण चर्चेत

अफगाणिस्तानातील अमली पदार्थ पुनर्वसन केंद्रांवर बॉम्ब हल्ले केले आणि ज्याने पहलगाम दहशतवादी हल्ल्याचे कटकारस्थान रचले, तो सध्या एक महत्त्वाची कूटनीतिक भूमिका बजावत आहे. यावरून स्पष्ट दिसते की पंतप्रधान मोदी यांची प्रादेशिक आणि जागतिक कूटनीतीचे सार आणि शैली, तसेच नॅरेटिव्ह व्यवस्थापन, पाकिस्तानला एकटे पाडण्यात अपयशी ठरली आहे. उलट पाकिस्तानला एक नवी प्रतिमा मिळाली आहे, जी नोव्हेंबर २००८ मधील मुंबई दहशतवादी हल्ल्यांनंतर डॉ. मनमोहन सिंग यांनी घेतलेल्या भूमिकेच्या विरुद्ध असल्याचे रमेश यांचे म्हणणे आहे. भारतासाठी हा एक मोठा धक्का आहे. फील्ड मार्शल आसिम मुनीर, ज्यांच्या भडकाऊ आणि प्रक्षोभक वक्तव्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याला खतपाणी घातले. ते आता राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे जवळचे बनले आहेत, असा टोलाही त्यांनी लगावला आहे.

-------------

### पुस्तक आणि गणवेश खरेदीचा दबाव

शासनाने निर्णय घेऊन परिपत्रक काढले आहे. या निर्णयाच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी शिक्षण विभागाने नव्याने परिपत्रक जारी करत सर्व शिक्षणाधिकारी व प्रशासन अधिकाऱ्यांना दक्ष राहण्याचे आदेश दिले आहेत. पालकांकडून तक्रार प्राप्त झाल्यास तत्काळ चौकशी करून संबंधित शाळेवर कारवाई करण्यात येणार आहे.कोणत्याही शाळेने विद्यार्थ्यांवर विशिष्ट खासगी प्रकाशनांची पुस्तके खरेदी करण्याचेही बंधन घालू नये, असेही आदेशात नमूद आहे. राज्य मंडळ, सीबीएसई आणि आयसीएसई शाळांनी मान्यताप्राप्त पाठ्यपुस्तकेच वापरावीत, असे निर्देश देखील देण्यात आले आहेत. शिक्षण विभागाच्या या निर्णयामुळे पालकांना शैक्षणिक साहित्य खरेदीत मोकळीक मिळणार असून शाळांकडून होणाऱ्या आर्थिक सक्तीला आळा बसणार आहे.

---------

### गुणरत्न सदावर्तेंचा रिक्षाचालकांच्या मराठी

कष्टकरी जनसंघाच्यावतीने ट्रान्सपोर्ट कमिशनर यांच्या कार्यालयात धडकी दिली. तसेच, प्रताप सरनाईक यांच्या निर्णयाला विरोध करत संबंधित अधिकाऱ्यांस निवेदनही दिले. महाराष्ट्र तसेच देशभरात १ मे हा दिवस ''कामगार दिन'' म्हणून साजरा केला जातो. त्या पार्श्वभूमीवर राज्यातील रिक्षा व टॅक्सी चालकांवर कोणत्याही प्रकारचा मानसिक, सामाजिक किंवा प्रशासकीय त्रास होणार नाही याची खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे. अशा दिवशी कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणारी कोणतीही बेकायदेशीर, संविधानविरोधी किंवा कायद्याविरोधी विधाने व कृती करणे ही गंभीर बाब आहे, असे म्हणत गुणरत्न सदावर्ते यांनी आज ट्रान्सपोर्ट आयुक्तांना रॅपिडो आणि रिक्षाचालकांच्यावतीने निवेदन दिले. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षाचालकांना केलेल्या मराठी सक्तीचा विविध कामगार संघटनांनी स्पष्ट विरोध दर्शविला असून, भाषेच्या नावाखाली कोणत्याही नागरिकास किंवा कामगारास त्रास दिला जाणार नाही ही मूलभूत अपेक्षा व्यक्त केली आहे. भाषा हा संवादाचा विषय असून, ती दडपशाहीचे साधन बनविणे हे संविधानाच्या तत्त्वांना बाधक आहे, असे सदावर्ते यांनी म्हटलंय. ट्रान्सपोर्ट कमिशनर हे संबंधित क्षेत्रातील प्रमुख असल्याने, त्यांच्या अधिकारक्षेत्रातील सर्व यंत्रणांनी कोणत्याही चालकास बेकायदेशीर त्रास होणार नाही याची खात्री करणे ही त्यांची प्रशासकीय व कायदेशीर जबाबदारी आहे, असे म्हणत ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाकडे रिक्षाचालकांनी मागण्या केल्या आहेत.

--------

### जम्मू-काश्मीरमध्ये बस

केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत माहिती दिली की, अपघातग्रस्त बस सार्वजनिक वाहतुकीची होती. सध्या जखमींवर उधमपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, पंतप्रधान मोदी म्हणाले, जम्मू आणि काश्मीरमधील उधमपूर येथे बस अपघातामुळे झालेल्या जीवितहानीची बातमी ऐकून मला अत्यंत दुःख झाले आहे. ज्यांनी या दुर्घटनेत आपले जवळचे आणि प्रियजन गमावले आहेत, त्यांच्याप्रती मी माझ्या मनापासून संवेदना व्यक्त करतो. जखमींनी लवकरात लवकर बरे व्हावे, यासाठी मी प्रार्थना करतो, असेही मोदी यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये दिली आहे.

---------

### लातूरमध्ये सात वर्षांच्या चिमुरड्याची सख्ख्या

तपासचक्र फिरवली. पोलीस अधीक्षक अमोल तांबे आणि अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी स्वतः घटनास्थळी धाव घेत पाच विशेष पथके तयार केली. तपासादरम्यान घरातील व्यक्तींच्या हालचालींवर लक्ष ठेवले असता, मृताची काकू अनिता स्वामी हिचे वर्तन संशयास्पद आढळले. तिने दिलेली विसंगत माहिती आणि घटनेनंतर बंद असलेला तिचा मोबाईल यामुळे संशय बळावला. अनिताने गुन्ह्याची कबुली दिली. आरोपी अनिताच्या पतीचे दुसऱ्या महिलेशी अनैतिक संबंध असल्याचा तिला संशय होता, त्यावरून त्यांच्यात सतत वाद होत असत. पतीच्या प्रेयसीला खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी अनिताने हा भयंकर कट रचला. स्वतःच्या आणि दिराच्या मुलाच्या अपहरणाचा बनाव रचून तिने देवांशची हत्या केली आणि त्याचा मृतदेह लपवून ठेवला.

-----------

### नेताजी सुभाषचंद्र बोस यांना

आक्षेप नोंदवला. न्यायालयने स्पष्ट केले की, ही याचिका केवळ प्रसिद्धी मिळवण्यासाठी दाखल करण्यात आली आहे. अशा याचिका आधीही फेटाळण्यात आल्या आहेत, असे सांगत खंडपीठाने सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्री विभागाला महत्त्वाचे आदेश दिले. भविष्यात या याचिकाकर्त्याची कोणतीही जनहित याचिका नोंदवून घेऊ नका, असे निर्देश देण्यात आले आहेत.

--------

दैनिक **राज्य लोकतंत्र**
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार, दि.२१ एप्रिल २०२६


## थोडक्यात



### शेतकऱ्यांना फार्मर कप वरदान ठरणार –नगराध्यक्ष राजू जाधव

पाटोदा । प्रतिनिधी

आज पाटोदा येथे लोकनेते सुरेश (आण्णा) धस व सौ प्रजाक्ताताई (काकू) धस संचालक महानंदा दूध संघ मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा तालुक्यातील शेतकरी व महिला प्रशिक्षण प्रशिक्षणात मोठ्या संख्येने सहभागी झाले याप्रसंगी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

पाणी फाउंडेशन, उमेद अभियान आणि कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने फॉर्मर कप स्पर्धा २०२६ पाटोदा तालुक्याचे तीन दिवसीय प्रशिक्षण राळेगणसिद्धी या ठिकाणी संपन्न होणार आहे. या करिता मोठ्याप्रमाणात युवा शेतकरी व उमेद अभियानाच्या महिला या प्रशिक्षणात सहभागी झाल्या आहेत.या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश शेती करताना शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे व अतिरिक्त खर्च कमी करणे हा आहे.या वेळी प्रशिक्षणाला जाताना शुभेच्छा देण्यासाठी नगराध्यक्ष राजू (भैय्या) जाधव, तालुका कृषी अधिकारी शेळके साहेब,आगार व्यवस्थापक मा. डोके साहेब, उमेद अभियान मा भोसले साहेब, वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट चे कैलास पन्हाळकर, कृषी विभाग कर्मचारी व इतर विभागाचे कर्मचारी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**आष्टी तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयाच्या बाबाजी ऊद्यानात स्व. आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. माजी आ. भीमराव धोंडे यांनी बाबाजी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला.यावेळी ह.भ.प. भागचंद झांजे, माजी संचालक पांडुरंग गावडे,प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य दादासाहेब काळे,उपप्राचार्य संजय धोंडे,प्राचार्य अशोक गदादे, उपप्राचार्य प्रोफेसर बापू खैरे,ग्रंथपाल प्रा.डॉ.श्याम सांगळे, सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी इतर उपस्थित होते.**



युवा नेते भावी सरपंच वटनवाडी कीरण शिनगिरे याचा वाढदिवसाच्या निमित्ताने सत्कार करताना सरपंच परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दत्ताभाऊ काकडे. आष्टी तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष शरद भाऊ रेडेकर..छाया बंडु सोनटक्के

# टीव्ही अँकर होण्यासाठी भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक !

## उदगीर येथील अधिवेशनात सुप्रसिद्ध टीव्ही अँकर प्रसन्न जोशी,विशाल परदेशी,प्रज्ञा पोवळे,श्वेता दांडेकर, सौरभ कोरटकर, विशाल पाटील यांची ''टीव्ही पडद्यावरची दुनिया'' या विषयावरील दिलखुलास चर्चा

उदगीर । प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे अधिवेशन १८ व १९ एप्रिल या दोन दिवसांत उत्साहात पार पडले. देशभरातून आलेल्या पत्रकार, संपादक आणि माध्यम प्रतिनिधींच्या उपस्थितीत हे अधिवेशन विचारमंथन, मार्गदर्शन आणि पत्रकारितेच्या विविध पैलूंवर चर्चा करण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरले.

अधिवेशनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन सत्रात पत्रकारितेतील बदलते स्वरूप, डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव आणि पत्रकारितेतील नैतिकता या विषयांवर सखोल चर्चा झाली. वक्त्यांनी पत्रकारांनी वस्तुनिष्ठता, सत्यता आणि जबाबदारी जपत काम करणे आजच्या काळात अधिक आवश्यक असल्याचे अधोरेखित केले. दुसऱ्या दिवशी विविध विषयांवर तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 'डिजिटल पत्रकारिता', 'फेक न्यूजचा वाढता धोका', 'ग्रामीण पत्रकारितेची आव्हाने' आणि 'अँकरिंग व संवाद कौशल्य' या विषयांवर तज्ज्ञ पत्रकारांनी मार्गदर्शन केले. सहभागी पत्रकारांनी या सत्रांमध्ये सक्रिय सहभाग घेत अनुभव शेअर केले आणि प्रश्नोत्तरांद्वारे आपले शंका निरसन करून घेतले.

ग्रामीण भागातील पत्रकारांना टीव्ही अँकर होण्यासाठी सर्व गोष्टीचा अभ्यास व भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.



ग्रामीण भागातील पत्रकारांना टीव्ही अँकर होण्यासाठी सर्व गोष्टीचा अभ्यास व मराठी /हिंदी भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे ,असे उदगीर येथील व्दितीय सत्रातील अधिवेशनात सुप्रसिद्ध टीव्ही अँकर प्रसन्न जोशी,विशाल परदेशी,प्रज्ञा पोवळे,श्वेता दांडेकर, सौरभ कोरटकर, विशाल पाटील यांनी ''टीव्ही पडद्यावरची दुनिया'' या विषयावर सविस्तर चर्चा करताना व्यक्त केले.

अधिवेशनादरम्यान काही महत्त्वपूर्ण ठरावही मंजूर करण्यात आले. पत्रकारांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांना सामाजिक सुरक्षा योजना लागू करणे, तसेच ग्रामीण भागातील पत्रकारांना अधिक सुविधा मिळाव्यात, यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

समारोप सत्रात आयोजकांनी अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. उपस्थित मान्यवरांनी अशा अधिवेशनांमुळे पत्रकारांना दिशा आणि नवी ऊर्जा मिळते, असे मत मांडले.एकूणच, उद्गीर येथे पार पडलेले अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे अधिवेशन पत्रकारितेच्या क्षेत्रातील सध्याच्या प्रश्नांवर प्रकाश टाकणारे आणि भविष्याची दिशा ठरवणारे ठरले.

दोन दिवसीय अधिवेशनाचे अध्यक्ष मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर व अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर हे होते.तर विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे,कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे,कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख,महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डिजीटल मिडीया चे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे,विभागीय सचिव रवी उबाळे,समन्वयक सुभाष चौरे,जिल्हा समन्वयक अभिमान्यू घरत ,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हांगे,बीड जिल्हाध्यक्ष विशाल सांळुके सह आदी पदाधिकाऱ्यांनी नियोजनबद्ध अधिवेशन कार्यात उपस्थिती होती. दोन दिवसीय संपन्न झालेल्याअधिवेशनात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो पत्रकार उपस्थित होते.अधिवेशन यशस्वी करण्यासाठी उदगीर संघाचे विभागीय सचिव तसेच अधिवेशन मुख्य संयोजक सचिन शिवशेट्टे, रवी उबाळे,प्रकाश कांबळे,उदगीर तालुकाध्यक्ष युवराज धोतरे,डीजीटल मिडीया तालुकाध्यक्ष विभीषन मद्देवाड, हल्ला कृती तालुकाध्यक्ष अर्जून जाधव,सचिव सिद्धार्थ सूर्यवंशी आदींनी परिश्रम घेतले.

# परशुराम जयंती सत्य, शौर्य आणि धर्मरक्षणाचा संदेश देणारा दिवस– व्याख्याते विश्वंभर पाठक

**माजलगाव । प्रतिनिधी**

**भगवान परशुराम जयंती ही केवळ धार्मिक परंपरा नसून सत्य, शौर्य आणि धर्मरक्षणाचा संदेश देणारा पवित्र दिवस असल्याचे व्याख्याते विश्वंभर पाठक यांनी सांगीतले. शहरातील दत्त मंदिरात समस्त ब्राम्हण समाजाच्या वतीने आयोजित व्याख्यान कार्यक्रमात भगवान परशुराम जयंतीच्या पुर्वसंध्येला दि. १८ शनिवारी बोलत होते.**

पुढे बोलतांना व्याख्याते श्री. पाठक म्हणाले की, क्षात्रतेज आणि ब्रम्हतेज ज्यांच्या ठायी एकवटले आहे असे श्री भगवान परशुराम आहेत. त्यांनी अन्यायी राजाच्या विरूध्द लढा देउन दुष्टांचे निर्दालन केले. भगवान परशुराम हे केवळ योध्दा नसून स्थापत्य शास्त्रज्ञ, शेतकी तज्ञ आणि शास्त्र आणि शस्त्र अशा दोन्ही गोष्टींत पारंगत होते तर भगवान विष्णुचा ते सहावा अवतार होते असेही सांगीतले. प्रास्ताविक नगरसेवक डॉ. सचिन देशमुख यांनी केले. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, सुरेश भानप, डॉ. स्वानंद कुलकर्णी, बप्पा देशमुख यांची उपस्थिती होती. सुत्रसंचालन हिमांशु देशमुख यांनी केले तर आभार प्रा. समीर मुळी यांनी मानले. कार्यक्रमास अनंतशास्त्री जोशी, बी. एन. कुलकर्णी, दत्ता काळे, नंदकुमार आनंदगांवकर, भालचंद्र पाठक, डॉ. शैलेश पाठक, मुकुंद जोशी, कमलेश जाब्रस, संतोष मुळी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी योगेश जोशी, प्रसाद देशमुख, सुयोग पोतदार, प्रशांत भानप, डॉ. महेश पारगावकर, डॉ. डी. जे. पारगावकर, संतोष काटकर, गोपाळ कुलकर्णी, सतीश जोशी, डॉ. प्रशांत पाटील, दत्ता महाजन, संतोष वाघोरकर, विनायक रत्नपारखी, सुनिल वैद्य, अमोल कुलकर्णी, स्वानंद पाठक, ओंकार जाब्रस यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमानंतर महाआरती करून प्रसादाचे वाटप करण्यात आले.



## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### आष्टीच्या अनिशा ग्लोबलमध्ये

आला. तसेच आमदार सुरेश धस यांनीही मनीषा ग्लोबल इंग्लिश स्कूल मधील प्राथमिक शिक्षणाचे धडे घेणार गेलेल्या उदयराज याची अवघ्या अठराव्या वर्षी लेफ्टनंट मध्ये निवड झाली ही अत्यंत कौतुकास्पद बाब असून भारतीय लष्करामध्ये तो अतिउच्च पदापर्यंत जाऊ शकतो हे आमच्या आष्टीवासीयांचे भाग्य आहे त्याचे हे नेत्र दीपक यश भावी पिढीला प्रेरणादायी आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त करून उदयराज काटे यांच्या कुटुंबासह त्याचा सन्मान त्यांनी आपल्या निवासस्थानी बोलवून केला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. उदयराज काटे याच्या यशामुळे आष्टी परिसरात आनंदाचे वातावरण असून त्याच्या या कामगिरीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

### बीड पोलीसांकडून धडधडणाऱ्या

२०२५ शनिवार रोजी सायंकाळी ५ ते ७ च्या दरम्यान अंबिका चौक व माने कॉम्प्लेक्स या ठिकाणी करण्यात आली. ज्यामध्ये एकुण १५ बुलेटचे सायलेन्सर जप्त करण्यात आले. तसेच फॅन्सी नंबरप्लेटवर देखील कारवाई करण्यात आली. पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, यापुढे ही मोहीम सातत्याने चालू राहील जे सायलेन्सर मोडीफाय करुन लावले असतील ते तात्काळ बदलून मुळ कंपनीचे सायलेन्सर लावण्यात यावे. रस्त्यावर स्टंटबाजी करणाऱ्या तसेच विशेषतः कॉलेज, क्लासेस, रहदारीच्या ठिकाणी मुद्दामहून होणाऱ्या वाहनांच्या आवाजाचा त्रास आणि कायद्याचे उल्लंघन खपवून घेतले जाणार नाही. नियम मोडाल, तर थेट मोठी कारवाई होईल असा इशारा पोलीस प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

पोलीस प्रशासनाकडून होणाऱ्या या कारवाईमुळे शहरात शिस्त प्रस्थापित करण्याचा प्रयत्न असून, नागरिकांनीही या मोहिमेचे स्वागत केले आहे तसेच समाधान व्यक्त होत आहे.

सायलेन्सरचा दहशतवाद संपवणार–जिल्हा वाहतुक शाखा

शहरात बुलेटसह इतर दुचाकींवर लावण्यात येणाऱ्या कर्णकर्कश सायलेन्सरविरोधात पोलीसांनी कडक भूमिका घेतली असून नागरिकांना त्रास देणाऱ्या आणि वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर विशेष मोहीम राबवून अशा वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करुन सायलेन्सरच्या आवाजाचा दहशतवाद संपवणार असल्याचे जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी दिलीपकुमार खेडकर आणि पोलिस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### अनुसूचित जातीच्या

आम्ही मागे घेण्यासाठी आंदोलन करणार आहोत मोर्चे काढणार आहोत. समाजामध्ये तेढ निर्माण करून सरकारला त्यांची पोळी भाजायची आहे कुठल्याही पद्धतीत हे वर्गीकरण थांबलं पाहिजे याच्यासाठी आम्ही सर्वजण एकत्र आलो आहोत आणि येणार आहोत आणि रस्त्यावरच्या आणि न्यायालयीन लढाई आम्ही लढणार आहोत.

### बीडमध्ये उसळला

गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला अभिवादन करून भीम गीतांच्या कार्यक्रमास प्रारंभ झाला. गायक आनंद शिंदे यांनी एकाहून एक भीम गीतं सादर करत उपस्थित भीमसैनिकांच्या भावनांना हात घातला.

आ. संदीप क्षीरसागर यांचे चोख नियोजन आणि भीमकन्यांचा सन्मान!

महापुरुषांच्या जयंतीत जीव ओतून काम करण्यासाठी सर्वदूर परिचित असलेले आ. संदीप क्षीरसागर यांनी भीम गीतांच्या कार्यक्रमाचे चोख नियोजन केले होते. विशेष म्हणजे आ. क्षीरसागर यांच्या नियोजनातून या कार्यक्रमास उपस्थित सर्व भीम कन्यांचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला.

### बीड येथिल कृषी प्रदर्शनाची

दालनात द्वारे तब्बल २०० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहे, एकदिवसीय पशुप्रदर्शन, डॉग शो तज्ज्ञांची चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार आहे विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन व समारोप प्रसंगी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा या शेतक यांचा गौरव करण्यात येणार आहे. या प्रदर्शनाचा बीड शहरासह जिल्ह्यातील शेतकर्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने संयोजक कृषिभूषण महेश बेदरे,स्वागताध्यक्ष दिलीपराव गोरे , निमंत्रक कार्याध्यक्ष कृषीभूषण शिवराम घोडके , स्वागत समिती प्रमुख गणेश बजगुडे, चंद्रकांत नवले , निमंत्रक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे,स्वागत समिती प्रमुख रमेश सानप, संभाजी जाधव, पुरस्कार समिती प्रमुख सुभाषराव सपकाळ , मान्यवर स्वागत समिती प्रमुख बंडू जटाळ, ॲड. गणेश करांडे, नियोजन समिती प्रमुख कैलास रकटे, राहुल टेकाळे, गणेश राऊत,व्यवस्थापन समिती प्रमुख शिवाजीराव जाधव, अशोक कागदे, बलभीमराव बोरवडे, प्रसिद्धी विभाग समिती प्रमुख मजीद शेख, सुभाष चौरे, उत्तम हजारे, संपादक संजय मालानी, संपादक कामरान शेख, संपादक जालिंदर धांडे, चर्चासत्र समितीप्रमुख जुबेर पठाण, धनंजय गुंदेकर पशुप्रदर्शन समिती सखाराम शेळके डॉ.संभाजी जाधव यांनी केले आहे.

शेतकऱ्यांना दिला जाणार मोफत स्टॉल

शासनाच्या मदतीविना हे प्रदर्शन होत असून गेल्या १८ वर्षापासून शासनाच्या कोणत्याही अनुदानाशिवाय ही संस्था हे प्रदर्शन सातत्याने आयोजित करते यावेळी प्रथमच जिल्ह्यातील उत्कृष्ट दर्जाचा उत्पादित केलेला धान्य माल थेट ग्राहकांच्या च्या दारात मिळावा या उद्देशाने शेतकऱ्यांना मोफत स्टॉल दिला जाणार आहे. तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम करणाऱ्या संस्थांना अल्प दरात स्टॉल दिला जाणार आहे स्टॉल बुकिंग साठी खालील ९८८१०४५३१५, ९४२२९४३३८, ८६००४७४६०६ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### ज्येष्ठ शिक्षक, पत्रकार

भावना व्यक्त होत आहेत. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे, मुलगी व जावई पोलीस उपनिरीक्षक राजू गायकवाड असा मोठा परिवार आहे.

मरणोपरांत सरपते कुटुंबीयांनी समाजासमोर ठेवला आदर्श

मधुकर सरपते यांच्या अंत्यविधीनंतर त्यांच्या अस्थींना नदीत विसर्जित करण्याऐवजी त्यांच्या शेतात खड्डा खांदून त्या जागी चिकूचे झाड लावण्यात आले. दहावा, तेरावा असे विधिवत कार्यक्रम टाळून पर्यावरण पूरक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आणि समाजासमोर एक आदर्श ठेवला.

# जि.प.शाळेत चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण

सौताडा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सौताडा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत रंगोत्सव आंतरराष्ट्रीय चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गणेश बेदरे सर होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच महादेव घुले, पालक प्रदीप काका जाधव ,हनुमान शिंदे, विजय शिंदे, युवराज शिंदे, प्रभू सानप, सतीश शिंदे आदींची उपस्थिती होती.

पाटोदा तालुक्यातील सौताडा येथील जि. प. माध्यमिक शाळेत गेल्या काही दिवसापूर्वी रंगोत्सव आंतरराष्ट्रीय चित्रकला स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेतील विद्यार्थ्यांना प्रोजेक्टर, ट्रॉफी, गोल्ड मेडल, गिफ्ट प्राईस अशी विविध बक्षिसे देण्यात आली. या बक्षिसाचे वितरण सोमवार दिनांक २० एप्रिल रोजी करण्यात आले. या बक्षिसांबरोबरच विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गणेश बेदरे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच महादेव घुले, पालक प्रदीप काका जाधव, हनुमान शिंदे, विजय शिंदे, युवराज शिंदे ,प्रभू सानप, सतीश शिंदे, याबरोबरच माजी विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक गणेश बेद्रे सर व कला शिक्षक अमोल शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक गणेश बेदरे सर, सरपंच महादेव घुले यांनी मार्गदर्शन केले तर शेवटी आभार रानमारे सर यांनी मानले. या कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोठ्या उत्साहात हा सोहळा पार पडला.



# प्रा. बबनराव आंधळे यांना विधान परिषदेत संधी द्यावी; बीड जिल्ह्यातून जनतेची जोरदार मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेले बानेगाव येथील प्रा. बबनराव आंधळे यांना महाराष्ट्र विधान परिषदेत संधी द्यावी, अशी मागणी आता जिल्ह्यातून जोर धरू लागली आहे.



८ जानेवारी १९७५ रोजी बानेगाव येथे माता मुक्ताई यांच्या पोटी त्यांचा जन्म झाला. वडील दगडू आंधळे हे मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे अल्पभूधारक शेतकरी होते. अत्यंत सामान्य परिस्थितीतून शिक्षण घेत त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला.

प्रा. आंधळे यांनी प्राथमिक शिक्षण गावात पूर्ण केल्यानंतर बीड येथील मागासवर्गीय वस्तीगृहात राहून पुढील शिक्षण घेतले. पाचवी ते दहावीपर्यंत भगवान विद्यालयात, अकरावी-बारावी बंकट स्वामी महाविद्यालयात तर पुढे बलभीम महाविद्यालय, बीड येथे त्यांनी उच्च शिक्षण पूर्ण केले. मार्गदर्शक प्रा. सुशीलाताई मोराळे यांच्या प्रेरणेने जून १९९३ मध्ये संत तुकाराम प्राथमिक विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. तेव्हापासून ते शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने काम केले आहे. सामाजिक भान जपत प्रा. आंधळे यांनी ओबीसी, शेतकरी तसेच दलित–वंचित बहुजन समाजाच्या प्रश्नांसाठी नेहमीच आवाज उठवला. विविध आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग घेत त्यांनी अन्यायाविरोधात लढा दिला. ग्रामीण युवक संघटनेच्या माध्यमातून युवकांना रोजगार, प्रशिक्षण आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. शेतमालाला योग्य भाव मिळावा यासाठी त्यांनी आंदोलने, धरणे आणि मोर्चे काढले. तसेच दिवंगत रामविलास पासवान दूरसंचार मंत्री असताना त्यांची बीड जिल्हा दूरसंचार सल्लागार समितीवर निवड झाली होती. त्यांनी लोक जनशक्ती पार्टीचे जिल्हाध्यक्ष म्हणूनही काम पाहिले आहे. २००० पासून ते बानेगाव ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. गावात मुलगी जन्माला आल्यास तिच्या नावाने आर्थिक मदत देण्याचा अभिनव उपक्रम त्यांनी राबवला. महिलांसाठी बचत गट स्थापन करून त्यांना उद्योगासाठी कर्ज उपलब्ध करून देण्याचे काम त्यांनी केले. शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठीही त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. भीक मागो आंदोलन, बीडला रेल्वे आणण्यासाठीचे आंदोलन यांसारख्या विविध चळवळींमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. बीड जिल्हा लोकशाही पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले आहे. २०२६ मध्ये त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या प्रा. बबनराव आंधळे यांना विधान परिषदेत संधी मिळाल्यास वंचित बहुजन समाजाच्या प्रश्नांना न्याय मिळेल, असा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत.

# आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करायचे असेल तर शालेय जीवनात अभ्यास करा – साक्षी पटाईत

दिंद्रुड । प्रतिनिधी

आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करायचे असेल तर शालेय जीवनात अभ्यासावर लक्ष केंद्रित करा. गुरुजनाचे योग्य मार्गदर्शन कामाला येईलच, मात्र त्यांना अभिमान वाटेल असे ध्येय गाठा, असे विधान नुकतेच सी बी एस सी बोर्डातून जवाहर नवोदय विद्यालयात प्रथम आलेल्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनी साक्षी पटाईत हिने केले आहे. देवदूत प्रतिष्ठान व दिंद्रुड पत्रकार संघाच्या वतीने तिच्या सत्काराचे आयोजन येतील डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या निवासस्थानी सोमवारी करण्यात आले होते त्या प्रसंगी ती बोलत होती.

देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमास दिंद्रुड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक पवनसिंग जंघाले, पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, पांडुरंग झोडगे, व्यंकटेश फपाळ सह पत्रकार संघाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. नुकत्याच झालेल्या जवाहर विद्यालय शिवाजीनगर, गढी या इयत्ता दहावी च्या सीबीएससी बोर्डाच्या परीक्षेत ९७ टक्के गुण घेत साक्षी भागवत पटाईत (रा.विडा ता.केज) ने प्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. पुढील शिक्षणासाठी जवाहर विद्यालय प्रणित अवंती फाउंडेशन वर्धा येथे तिला प्रवेश मिळाला असून तिच्या या यशाबाबत जवाहर विद्यालयाच्या पालक वर्गाने आनंद व्यक्त करत तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी शालेय शिक्षणात भरीव कामगिरी करत असल्या बाबत पोलीस उपनिरीक्षक पवनसिंग जंगाले यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार गणेश काटकर तर आभार नागेश वखरे यांनी मानले. पत्रकार संतोष स्वामी, एकनाथ हंगरगे, धोंडीराम ढोरमारे आदींनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



**घनसावंगी नगरपंचायत, घनसावंगी**
**प्रशासकिय इमारत, घनसावंगी जि. जालना**

e-mail.npghansawangi@gmail.com 02482 271787
जा.क्र.२०२६/घनपं/स्थापत्य वि-०२/८५ दि. २०/०४/२०२६

**बांधकाम विभाग**

ई-निविदा सुचना क्रमांक-०१- सन २०२६-२७ (पहिली वेळ)

घनसावंगी नगर पंचायतीने नागरी दलितेत्तर योजना (जिल्हास्तर) सन २०२५-२६ अंतर्गत खालील प्रमाणे सार्वजनिक बांधकामे हाती घेणे करीता ई-निविदा बी-१ फॉर्म मध्ये अनुभवी व नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे.

ई-निविदा बाबतचा सविस्तर तपशील http:/www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.२८/०४/२०२६ रोजीपर्यंत उपलब्ध आहे.

* कोणतेही निविदा मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार नगरपंचायतने राखून ठेवलेला आहे.
* निविदे सोबत कोणतीही मार्गदर्शक सुचना, शुध्दीपत्रक अथवा इतर माहिती http:/www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहवायास मिळेल
* सदर ई-निविदा शासनाच्या http:/www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन दाखल करता येईल.

**(संतोष वाघमारे)**
**मुख्याधिकारी**
**घनसावंगी नगरपंचायत**

# ‘एल निनो’चे संकट मर्यादित राहणार; केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान

## खरीप हंगामाच्या तयारीसाठीच्या बैठकीत जिल्हास्तरीय तयारी करण्याचे राज्यांना निर्देश

दिल्ली / प्रतिनिधी

यंदाच्या ‘एल निनो’च्या संभाव्य धोक्यामुळे शेती क्षेत्राचे नुकसान मर्यादित राहील. सुधारित सिंचन सुविधा, समाधानकारक पाणीसाठे आणि पूर्वीपेक्षा अधिक तयारीत असलेले शेतकरी यामुळे काळजी करण्याची गरज नाही, असे प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केले.

चौहान यांच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगामाच्या तयारीसाठी बैठक झाली. येत्या हंगामासाठी सरकार पूर्ण तयारीनिशी सज्ज असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. सरकारच्या या आत्मविश्वासामागे पाणीसाठ्यांची सद्यःस्थिती हे मुख्य कारण आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. देशभरातील धरणांतील पाणीसाठा या हंगामातील सरासरीच्या १२७ टक्के आहे. यामुळे हंगामभर सिंचनासाठी पाणी उपलब्ध होईल, असाही दावा त्यांनी केला.



तसेच खरीप आणि रब्बी हंगामांसाठी बियाण्यांचा साठा गरजेपेक्षा जास्त आहे. प्रतिकूल हवामानामुळे नव्याने पेरणीची गरज भासल्यास किंवा पीक बदलावे लागल्यास आपत्कालीन साठादेखील उपलब्ध आहे. अधिकाऱ्यांनी २००० ते २०१६ या काळातील ‘एल निनो’ परिणामांशी तुलना केली. त्यावेळी शेतकऱ्यांना पावसावर जास्त अवलंबून राहावे लागले होते. हवामानाच्या आपत्तींचा सामना करण्यासाठी तेव्हा साधनांचा अभाव होता. त्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले.

त्यानंतर भारताने सूक्ष्म सिंचनप्रणालीचा विस्तार केला, हवामान प्रतिकारक बियाणे आणली आणि पूर्वसूचना प्रणाली मजबूत केली. यामुळे शेतीतील असुरक्षितता कमी झाली आहे, असे शेतकऱ्यांनी सांगितले. चौहान यांनी राज्य सरकारांना थेट जिल्हास्तरीय उपाययोजना कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले. दुष्काळ-सहिष्णू बियाणे आणि उशिरा पेरणी हा शेतकऱ्यांसाठी व्यावहारिक पर्याय असल्याचा प्रचार करण्याबाबतही त्यांनी राज्य सरकारांना यावेळी निर्देश दिले.

## सिताफळ लागवडीसाठी या जातींची लागवड देईल भरघोस उत्पादन आणि बक्कळ नफा



जर कोरडवाहू जमिनीतील लागवड योग्य फळबागाचा विचार केला तर सिताफळ लागवडीचा प्राधान्याने विचार करावा लागेल. कारण बऱ्याच प्रमाणात असलेल्या उथळ व हलक्या जमिनीत पारंपारिक पिके घेणे ऐवजी कोरडवाहू फळबागांची लागवड खूप महत्त्वपूर्ण ठरू शकते. या दृष्टिकोनातून जर आपण विचार केला तर कोरडवाहू फळ पिकातील महत्त्वाचे पीक म्हणजे सिताफळ हे होय. हे समशितोषण कोरड्या प्रदेशातील फळपिक असून महाराष्ट्रातील हवामान हे सिताफळ लागवडीसाठी खूप फायदेशीर आहे. साधारण प्रमाणे पाचशे ते साडेसातशे मिमी पाऊस पडणाऱ्या भागात सिताफळाची उत्कृष्ट प्रकारे लागवड यशस्वी होते.

सिताफळाच्या दोन महत्त्वपूर्ण जाती : अर्का सहन- या जातीचे सिताफळ गुणवत्तेच्या बाबतीत खूप सरस असून यामध्ये गोडपणा जास्त असतो. या जातीच्या एका सिताफळाचे वजन एक ते दीड किलोपर्यंत भरते. साखरेचे प्रमाण २२% पेक्षा जास्त असून यामध्ये बिया खूप कमी असतात. म्हणजेच एकूण फळाच्या वजनाच्या केवळ दहा टक्के बिया असतात. या जातीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या जातीच्या परागीकरणास हाताने परागीकरण करावी लागते जेणेकरून फळांची वाढ योग्य रीतीने होऊन फळांचे चांगले उत्पादन वाढते व उत्पादनही चांगले मिळते. अशाप्रकारे परागीकरण केल्यामुळे या जातीच्या सिताफळाला बाजारपेठेत खूप चांगला भाव मिळतो. जर आपण उत्पादनाचा विचार केला तर आठ वर्षात ४० ते ४५ किलो उत्पादन एक झाड देते व एकरी उत्पादन १० टन इतके मिळते.

बाळानगर- महाराष्ट्रामध्ये ही जात अतिशय प्रसिद्ध असून या जातीच्या एका फळाचे सरासरी वजन ३६० ग्रॅम असते व सरासरी ४० बिया असतात. या जातीच्या सीताफळाची वैशिष्ट्य म्हणजे बी कमी व गर जास्त असतो. या फळाच्या गरात साखरेचे प्रमाण साधारण असते व टिकाऊपणा जास्त असतो. सिताफळ प्रक्रिया उद्योगांमध्ये बाळानगर या वाणाचा गर जास्त प्रमाणात वापरला जातो. इतर सीताफळच्या जातींपेक्षा या सीताफळाला बाजार भाव चांगला मिळतो.

## नारळ फळबागात होणारे रोग आणि नियंत्रण

नारळ फळबागांचा विचार केला तर महाराष्ट्राच्या किनारपट्टी भागामध्ये नारळ फार मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. परंतु आता नारळाची लागवड महाराष्ट्रातील इतर भागात देखील बऱ्या प्रमाणात होऊ लागल्यामुळे तसेच बऱ्याच शेतकऱ्यांच्या बांधांवर वगैरे मिळून देखील शेतामध्ये १० ते २० झाडे असतातच. जर आपण नारळ या फळ पिकाचा विचार केला तर यावर देखील इतर फळबागांप्रमाणे काही रोगांचा प्रादुर्भाव होत असतो व त्यामुळे बरेच नुकसान होते. त्यामुळे या लेखामध्ये आपण नारळ फळबागेतील काही महत्त्वाचे रोग व त्यावरील नियंत्रणाचे उपाय याबद्दल माहिती घेऊ.

नारळ झाडावरील काही महत्त्वाचे रोग : नारळाची फळगळ- हा रोग नारळाच्या कोवळ्या फळाच्या देठावर होतो, त्यामुळे नारळाचे फळे गळून पडतात. सुरुवातीच्या काही कालावधीमध्ये नारळाच्या झाडांना फळ धरण्यासाठी मादी फुलांना नर फुलातील पुकेसर न मिळाल्यामुळे फळांची नैसर्गिक गळ होते. तसंच काही बुरशीजन्य रोगांमुळे देखील फळगळ होते. उपाय - या रोगाच्या नियंत्रणासाठी एक टक्का बोर्डो मिश्रणाच्या दोन फवारण्या एक महिन्याच्या अंतराने फवाराव्यात. पहिली फवारणी पावसाळ्याच्या सुरुवातीला व त्यानंतरची एक महिन्यानंतर करावी. बऱ्याचदा नारळाच्या फळांची गळ प्रामुख्याने उंदरांच्या प्रादुर्भावामुळे होते. यामध्ये उंदीर नारळाची कोवळी फळे पोखरतात. उंदरांच्या बंदोबस्तासाठी झावळ्या स्वच्छ ठेवाव्यात. औषध दिल्यानंतर ४५ दिवस नारळ काढू नये तसेच नारळास दहा किलो निंबोळी पेंड, झिंक, बोरॉन आणि कॉपर सारखे अति सूक्ष्म अन्नद्रव्य २०० ग्रॅम प्रति झाड दरवर्षी द्यावे.

नारळाच्या झाडावरील करपा रोग- बऱ्याचदा नारळाच्या झाडाच्या पानावर करपा रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. यामुळे पानावर लालसर तपकिरी रंगाचे ठिपके पडून पाने पिवळी होतात. अशा ठिपक्यांचे प्रमाण हे पक्क असलेल्या पानांवर जास्त प्रमाणात दिसून येते. सुरुवातीला हे ठिपके अतिशय लहान असतात परंतु नंतर ते वाढत जाऊन एकमेकांमध्ये मिसळतात व पूर्ण पान करपून जाते. उपाय - करपा रोगाचा प्रादुर्भाव हा पाण्याच्या आणि खताच्या कमतरतेमुळे मोठ्या प्रमाणावर होतो.

त्यामुळे पावसाळ्यानंतर बागेला नियमितपणे पाणी व्यवस्थापन करणे गरजेचे असून शेणखत आणि रासायनिक खते योग्य प्रमाणात द्यावीत. एवढेच नाही तर पावसाळा सुरू होण्यापूर्वी रोगग्रस्त झाडावरील करपलेल्या झावळ्या काढून माडाच्या निरोगी पानांवर एक टक्के तीव्रतेचे बोर्ड मिश्रण आता दोन ग्रॅम मॅन्कोजॅब एक लिटर प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.



## लिंबूनीच्या झाडांना लीफ मायनर कीटकांचा धोका; ही आहेत लक्षणे

देशातील शेतकऱ्यांचा फळबागा लागवडीकडे कल वाढत चालला आहे. आधुनिकीकरणामुळे फळबागांमध्ये पहिल्या तंत्राच्या तुलनेत आता जास्त कष्ट करण्याची गरज भासत नाही. कारण आधुनिक यंत्रामुळे औषध फवारणी आणि मशागत करणे सोपे झाले आहे. आधुनिक यंत्राद्वारे ही कामे केली जात असल्याने शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसाही वाचत आहे. खरे तर बागायती पिके ही शेतकऱ्यांसाठी नगदी पिके आहेत. त्यांची विक्री करून शेतकऱ्यांना चांगला नफा मिळतो. या भागात गेल्या काही वर्षांत लिंबूचे उत्पादन शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय झाले आहे. लिंबू हे शेतकऱ्यांचे नगदी पीक आहे. ज्याचे उत्पादन शेतकऱ्यांसाठी सोपे मानले जाते. परंतु, ते फायदेशीर करण्यासाठी, शेतकर्यांनी अनेक खबरदारी घेणे आवश्यक आहे. ज्यामध्ये लीफ मायनर कीटक शेतकऱ्यांसाठी लिंबू रोपासाठी आवश्यक आहे. तसे न केल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊ शकते.

हा कीटक फक्त लहान वनस्पतींमध्ये आढळतो : देशातील ज्येष्ठ फळ शास्त्रज्ञ डॉ. एस.के. सिंग यांच्या मते, लिंबाची रोपटी लहान असताना त्या काळात लिंबूवर्गीय पानावरील किरकोळ लिंबूवर्गीय कीटक दिसून येतो.

ते म्हणाले की, ही एक प्रमुख कीड असून मार्च ते नोव्हेंबरपर्यंत सक्रिय राहते. लिंबू, संत्रा आणि पोमेलो यांसारख्या लिंबूवर्गीय फळांच्या गटाचे ते नुकसान करते. ते म्हणाले की लिंबूवर्गीय लीफमायनर अळ्या लिंबाच्या झाडांच्या कोवळ्या पानांमध्ये उथळ बोगदे किंवा खोबणी बनवून



स्वतःला खातात. कीटक सामान्यतः संत्री, मँडरीन, लिंबू, पेपरमिंट्स, द्राक्षे आणि इतर वनस्पतींवर आढळतात. लिंबूवर्गीय लीफमायनर ही एकमेव खाण कीटक आहे. जे सहसा लिंबू (लिंबूवर्गीय) पानांवर हल्ला करतात.

या किडीची लक्षणे : लिंबूवर्गीय लीफमायनर हा एक अतिशय लहान, हलका रंगाचा कीटक आहे, जो १/४ इंचापेक्षा कमी लांबीचा आहे. यात तपकिरी आणि पांढर्या खुणा असलेले चांदीचे आणि पांढरे इंद्रधनुषी अग्रभाग आणि प्रत्येक पंखाच्या टोकावर एक वेगळा काळा डाग आहे. मागचे पंख आणि शरीर पांढरे असून मागचे पंख मार्जिनपासून पसरलेले आहेत. कीटकांच्या अळ्या फक्त लिंबाच्या पानांच्या खोडांमध्ये आणि इतर जवळच्या वनस्पतींमध्ये आढळतात, जसजशी अळी विकसित होते तसतसे ते पानाच्या पृष्ठभागावरून खाली वाहणाऱ्या शिरांच्या आत एक पातळ विष्ठा सोडते, एक पातळ रेषा म्हणून दिसते. ही विशेषता कीटक ओळखण्यात मदत करण्यासाठी वापरली जाते.

कीटक जीवन चक्र : लिंबूवर्गीय लीफमिनरच्या जीवनाच्या चार अवस्था असतात ज्यात अंडी, अळ्या, प्यूपा आणि प्रौढ कीटक यांचा समावेश होतो. प्रौढ वनस्पतींना हानी पोहोचवत नाहीत आणि फक्त १ ते २ आठवडे जगतात. प्रौढ पतंग पहाटे आणि संध्याकाळच्या वेळी सर्वात जास्त सक्रिय असतात आणि दिवसभर पानांच्या खालच्या बाजूला विश्रांती घेतात, परंतु क्वचितच दिसतात. प्युपल केस सोडल्यानंतर लगेच, मादी कीटक लैंगिक फेरोमोन उत्सर्जित करते जे नर कीटकांना आकर्षित करते. संभोगानंतर, मादी यजमान पानांच्या खालच्या बाजूला एकच अंडी घालते. झाडावर, फ्लश ग्रोथची नवीन उगवलेली पत्रके विशेषतः पसंतीची ओवीपोझिशन साइट आहेत.

किडींच्या हल्ल्यामुळे पाने सुकतात : लिंबूवर्गीय पानांची खाण लिंबूवर्गीय पिकांमध्ये अळ्या म्हणून जगू शकते. मोठी लोकसंख्या असल्याशिवाय, कडक झालेली जुनी पाने संवेदनाक्षम होत नाहीत.

अळ्या नव्याने उगवलेल्या पानांच्या खालच्या किंवा वरच्या पृष्ठभागामध्ये प्रवेश करतात, ज्यामुळे ते वळण आणि विकृत होतात. या किडीचा प्रादुर्भाव झालेली पाने पिवळी पडतात, सुकतात आणि शेवटी फांद्यावर पडतात किंवा सुकतात. लिंबूवर्गीय कॅन्कर, जिवाणूजन्य रोगामुळे खाण दुखापती संसर्गाचे केंद्र म्हणून काम करतात.

लिंबूवर्गीय लीफमायनर किडीचे नियंत्रण : देशातील ज्येष्ठ फळ शास्त्रज्ञ डॉ.एस.के.सिंग यांच्या मते, शेतकऱ्यांनी या किडीचा प्रादुर्भाव झालेली पाने गोळा करून नष्ट करावीत. पावसाळ्यात बाधित भागांची छाटणी करावी.

वारंवार सिंचन आणि नायट्रोजन खतांचा जास्त वापर टाळा. अळ्या खाणीच्या आत असल्याने कीटकनाशकांच्या वापराने त्यांना सहज मारता येत नाही. तथापि, काही पद्धतशीर कीटकनाशकांच्या वापरामुळे संसर्ग काही प्रमाणात कमी होऊ शकतो.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### भारतीय नागरी सेवा दिन

### महत्वाच्या घटना

७५३ : रोम्युलस यांनी रोम स्थापन केले. (पारंपारिक तारीख)
१५२६ : मुघल साम्राज्याचे शासक सम्राट अकबर व सुलतान इब्राहिम लोदी यांच्यात पानिपतचे पहिले युद्ध होऊन त्यांत सुलतान इब्राहिम लोदी यांच्या पराभवानंतर दिल्ली येथील सुलतान शाहीचा अंत झाला.
१६६९ : छत्रपती शिवाजी महाराज यांनी समर्थ रामदास स्वामी यांची भेट घेतली.
१७२० : पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट्ट यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र थोरले बाजीराव पेशवे हे मराठा साम्राज्याचे उत्तराधिकारी बनले
१९३२ : नाशिकच्या काळाराम मंदिराचे दरवाजे सर्वांसाठी खुले ठेवण्याचा आदेश देण्यात आला.
१९४१ : दुसऱ्या महायुद्धा दरम्यान ग्रीस देश जर्मनी देशाला शरण गेला.
१९६० : रिओ दि जानेरो ह्या ब्राझील देशाच्या राजधानीचे उद्घाटन झाले.
१९७२ : ’अपोलो १६’ या अमेरिकन अंतराळयानातुन गेलेले जॉन यंग आणि चार्ल्स ड्युक हे अंतराळवीर चंद्रावर उतरले.
१९९६ : भारतीय वायू सेनेचे अधिकारी संजय थापर पॅराशूटच्या साह्याने उत्तर ध्रुवावर उतरले.
१९९७ : भारताचे १२ वे पंतप्रधान म्हणून डॉ. इंद्रकुमार गुजराल (वय ७८ वर्षे) यांनी सूत्रे हाती घेतली. गुजराल हे वयाने ज्येष्ठ असलेले दुसर्या क्रमांकाचे पंतप्रधान आहेत. याआधी मोरारजी देसाई यांनी ८१ व्या वर्षी पंतप्रधानपदाची सूत्र हाती घेतली होती.
२००० : आई वडिलांच्या संपत्तीत परावलंबी विधवेलाही अधिकार असल्याचा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला.
२००७ : वेस्ट इंडीज देशातील क्रिकेट संघाचे महान क्रिकेटपटू ब्रायन लारा यांनी एकदिवसीय क्रिकेट खेळातून निवृत्ती घेतली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६४ : मॅक्स वेबर जर्मन अर्थशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ (मृत्यू: १४ जून १९२०)
१९०९ : ज.द. गोंधळेकर (जनार्दन दत्तात्रय गोंधळेकर), मराठी चित्रकार.
१९२२ : ॲलिएस्टर मॅकलिन स्कॉटिश साहसकथा लेखक (मृत्यू: २ फेब्रुवारी १९८७)
१९२६ : एलिझाबेथ (दुसरी) इंग्लंडची राणी. प्रदीर्घ कारकिर्दीच्या बाबतीत राणी व्हिक्टोरिया खालोखाल राणी एलिझाबेथचा दुसरा क्रमांक लागतो.
१९३४ : डॉ. गुंथर सोन्थायमर महाराष्ट्र लोकधर्म व मराठी संस्कृतीचे जर्मन अभ्यासक
१९४५ : भारतीय क्रिकेटपटू आणि अंपायर श्रीनिवासराघवन वेंकटराघवन यांचा जन्म.
१९५० : शिवाजी साटम अभिनेते
१९५० : भारतातील प्राख्यात किराणा घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे गायक पंडित उपेंद्र भट यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५०९ : हेन्री (सातवा) इंग्लंडचा राजा (जन्म: २८ जानेवारी १४५७)
१९१० : मार्क ट्वेन विख्यात अमेरिकन विनोदकार आणि कादंबरीकार (जन्म: ३० नोव्हेंबर १८३५)
१९३८ : सर मुहम्मद इक्बाल पाकिस्तानी कवी, तत्त्वज्ञ आणि राजकीय नेते (जन्म: ९ नोव्हेंबर १८७७)
१९४६ : जॉन मायनार्ड केन्स ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ (जन्म: ५ जून १८८३)
१९५२ : सर स्टॅफोर्ड क्रिप्स इंग्लिश राजकारणी (जन्म: २४ एप्रिल १८८९)
१९६४ : द्रविड चळवळीला चालना देणारे महान भारतीय तमिळ कवी भारतीदासन यांचे निधन.
२०१३ : शकुंतलादेवी गणितज्ञ, ज्योतिर्विद आणि अतिवेगाने आकडेमोड करणारी भारतीय महिला (जन्म: ४ नोव्हेंबर १९२९)

## शेळीपालनातील चाऱ्याचे नियोजन आणि व्यवस्थापन

पशुपालकांचा जवळजवळ ५० ते ६० टक्के खर्च हा जनावरांच्या आहारावर होतो. त्यामुळे कमीत कमी खर्चात जनावरांना चांगल्या पद्धतीचा पौष्टिक चारा कसा उपलब्ध करून देऊ शकतो यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. जनावरांना वर्षभर चारा मिळावा म्हणून आपण वेगळ्या पद्धतीने चाऱ्याची साठवण करू शकतो आणि जनावराची चाऱ्याची गरज भागवू शकतो.

शेळयांच्या आहारामध्ये मुख्यत्वेकरून झाडपाल्याचा उपयोग केला जातो. असा चारा वाढून सुद्धा दिला जातो त्यामुळे गोठ्याच्या आजूबाजूला अशा झाडांची लागवड करून तुम्ही चाऱ्यावरील खर्च कमी करू शकतात. शेळ्यांच्या वाढीसाठी आवश्यक असणारा चारा वर्षभर उपलब्ध राहण्यासाठी चाऱ्याचे वर्षभरासाठी व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. फायदेशीर शेळीपालनासाठी वर्षभर शेळ्यांच्या आहारामध्ये हिरव्या आणि वाळलेल्या चाऱ्याचा समावेश असायला हवा. शेळीला तिच्या वजनाच्या चार ते पाच टक्के शुष्क पदार्थांची आवश्यकता असते.पशुखाद्याचा विचार केला तर त्याच्यात ९०%,सुक्या चाऱ्यामध्ये ८९ टक्के आणि हिरव्या चाऱ्यामध्ये २० टक्के शुष्क पदार्थ असतात. तसेच एकदल धान्य पिकांमध्ये प्रथिनांचे प्रमाण सात ते अकरा टक्के असते. तर एकूण पचनीय पोषकतत्वे ६५ ते ७० टक्के असतात. त्याचप्रमाणे द्विदल धान्य पिकांमध्ये प्रथिनांचे प्रमाण १६ ते २० टक्केआणि एकूण पचनीय पोषक तत्वांचे प्रमाण ६० ते ६५ टक्के असते.

cmyk

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

मंगळवार दि.२२ एप्रिल २०२६


# अंबड, घनसावंगी तालुक्यात गॅस सिलिंडरची टंचाई

## नवीन कनेक्शन देणे बंद;नियोजन करा अन्यथा आंदोलनाचा इशारा



जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अंबड आणि घनसावंगी तालुक्यांमध्ये गॅसचे नवीन कनेक्शन बंद करण्यात आले असून असे अंबड गुरुकृपा गॅस एजन्सी वितरण कार्यालयामधून सांगण्यात येत आहे परंतु तसा जीआर अद्यापर्यंत समोर आला नसल्याचे दिसून येत आहे. तसेच सध्या गॅस सिलिंडरची टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर ग्राहक पंचायत जिल्हा जालना तर्फे जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आला असून, गॅस वितरकांनी योग्य नियोजन करून नियमानुसार वितरण करावे, असे आवाहन ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष डॉ. रमेश तारगे यांनी केले आहे.

अंबड, घनसावंगी तालुक्यात गॅस सिलिंडरचे नियोजन करा; अन्यथा आंदोलनाचा इशारा ग्राहक पंचायत यांचा जिल्हा पुरवठा विभागाला साकडे पुरवठा सुरळीत, तरीही टंचाई का? अंबड आणि घनसावंगी परिसरात गेल्या काही दिवसांपासून ग्राहकांना गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी कसरत करावी लागत आहे. यासंदर्भात ग्राहक पंचायतीने जिल्हा पुरवठा विभागाकडे विचारणा केली असता, जिल्ह्यासाठी ५५होणारा गॅस पुरवठा कमी झालेला नसल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. पुरवठा सुरळीत असतानाही ग्राहकांना वेळेवर सिलिंडर का मिळत नाही, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

डॉ. रमेश तारगे यांचे आवाहन: ''प्रशासनाकडून पुरवठा नियमित असतानाही जर टंचाई भासत असेल, तर गॅस वितरकांनी आपल्या वितरण व्यवस्थेत सुधारणा करणे गरजेचे आहे. वितरकांनी नियमानुसार आणि पारदर्शक पद्धतीने गॅसचे वाटप केल्यास सर्वसामान्यांना त्रास होणार नाही. ग्राहकांची गैरसोय थांबवण्यासाठी तात्काळ नियोजन करावे. प्रशासकीय दखल घेण्याची मागणी: जिल्हा ४पुरवठा विभागाने या दोन्ही तालुक्यांतील वितरण व्यवस्थेवर लक्ष ठेवून कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणीही ग्राहक पंचायतीने केली आहे. जर ही परि४स्थिती लवकर सुधारली नाही, तर ग्राहकांच्या हितासाठी ग्राहक पंचायत तीव्र भूमिका घेईल, असा इशाराही प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आला आहे.

## कर्नाटकातील शेतकऱ्याला जालन्यात लुटणाऱ्या दोघांना पोलिसांकडून अटक

### कारसह २१ लाख रुपयांचा मुद्देमाल केला जप्त

जालना। प्रतिनिधी

कर्नाटकातील शेतकऱ्याला झेंडूच्या बियाण्यांच्या खरेदीचा बहाणा करुन जालन्यात बोलविले. यानंतर त्याला आम्ही नामांकित सिडस कंपनीचे प्रोडक्शन मॅनेजर असल्याचे भासवून त्याला मारहाण करुन १७ किलो वजनाचे ७ लाख ७८ हजार ८०० रुपयांचे बियाणे चोरुन नेले होते. जालना शहरातील सेंट मेरी हायस्कुलसमोर ही घटना घडली होती. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून कारसह २१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सुनिल बाबासाहेब जगताप (व्यापार बियाणे खरेदी-विक्री, निवडुंगा), वैभव पांडुरंग जगताप अशी आरोपींची नावे आहेत.

कर्नाटकातील हावेरी जिल्ह्यातील शेतकरी लोकेश इलेगर यांना झेंडूच्या बियाण्यांच्या खरेदीचा बहाणा करुन जालन्यात बोलावण्यात आले. यानंतर आरोपींनी शेतकऱ्याला मोटारसायकलवर बसवून काही अंतरावर नेले आणि अचानक धक्का देऊन खाली पाडत बियाण्यांची जबरी चोरी करुन पसार झाले होते. घटनेची माहिती मिळताच जालना येथील सदर बाजार ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने तातडीने तपास सुरु केला.

तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी कन्हैय्यानगर परिसरात सापळा रचला. देऊळगाव राजा येथून जालन्याकडे येणाऱ्या काळ्या बोलेरो कारमधून प्रवास करणाऱ्या दोन संशयितांना अटक केली. आरोपींनी चौकशीदरम्यान गुन्ह्याची कबुली दिली. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक पंकज जाधव, एपीआय सचिन खामगळ, उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, सागर बाविस्कर, इरशाद पटेल, देविदास भोजने, आक्रुर धांडगे, सौरभ मुळे आदींनी केली. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेले झेंडू बियाणे, गुन्ह्यात वापरलेली बोलेरो कार आणि मोबाईल असा एकूण २१ लाख ३८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असल्याचे सांगण्यात आले.

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्ट्रीट स्मार्ट करा

### माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांचे प्रतिपादन, वडीगोद्रीत स्नेहसंमेलन कार्यक्रम



वडीगोद्री। प्रतिनिधी

प्रतिनिधी । वडीगोद्री ग्रामीण भागातून शाळेत येणारा विद्यार्थी मोठा असतो. त्याला थोडे स्ट्रीट स्मार्ट करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे, इंग्लिशसोबत विज्ञान, गणिताचे ज्ञान द्या. शिक्षणातील इतर कौशल्येही तयार करा,असे माजी मंत्री राजेश टोपे यांनी सांगितले. वडिगोद्री येथील ज्ञानगंगा इंग्लिश स्कूलच्या १० व्या वार्षिक स्नेहमिलन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय स्टेट बँक शाखेचे व्यवस्थापक रोहीत काळगे, विकास जिवरग, भाऊसाहेब कनके, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष बाळासाहेब नरवडे, सोमनाथ काळे, सुनील काळे उपस्थित होते.

टोपे म्हणाले, माणसाची पायाभरणी शाळेत होते. पायाभरणी पक्की झाली तर कोणतेही वादळ आले तरी ती ढासळत नाही. ही पायाभरणी चांगल्या संस्कारांनी मजबूत झाली पाहिजे. शाळेत अभ्यासाचे वर्ग भरपूर असतात. खेळ, व्यायाम, योगासनांचे वर्गही सुरू करणे गरजेचे आहे. विद्यार्थी फिट राहिला तर शिक्षणातील कोणतेही ध्येय गाठण्याची क्षमता तयार होते. शाळेत मुलांनी शिक्षकांना प्रचंड प्रश्न विचारले पाहिजेत, असे वातावरण तयार करा, पालकांनीही मुलांना जास्तीत जास्त प्रश्न विचारण्यासाठी प्रेरित करावे. विषय समजेपर्यंत प्रश्न विचारत राहा, शिक्षकांनी तयारी करून सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. धडा शिकवल्यानंतर मनात येणारे प्रश्न शिक्षकांना विचारून सोडवा. विद्यार्थ्यांनी आपसातही चर्चा करावी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांमधून शिकवलेल्या धड्याचे विश्लेषण करून तो नीट समजला पाहिजे. ही सवय लागली तर मुले अधिक आत्मविश्वासाने, अधिक गोडीने शिक्षण घेतील, असे टोपे म्हणाले. कार्यक्रमाला मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, विद्यार्थी, पालक उपस्थित होते. कार्यक्रमात माजी मंत्री राजेश टोपे यांचे स्वागत करताना पदाधिकारी. विद्यार्थ्यांनी सादर केल्या विविध कला स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, नाटिका, एकांकिका, गवळण, फॅन्सी ड्रेस आदी कला प्रकार सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. त्यामुळे स्नेहसंमेलन कार्यक्रम सुसंस्कृत आणि शैक्षणिक वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या कला, गुण आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारे हे स्नेहसंमेलन शाळेच्या सर्वांगीण शिक्षणपद्धतीचे दर्शन घडवणारे दिसून आले.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये चड्डी-बनियान गॅंग ची एन्ट्री

### बँक ऑफ महाराष्ट्रचे एटीएम फोडण्याचा प्रयत्न, घटना सीसीटीव्हीमध्ये कैद

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर शहरातील आकाशवाणी परिसरात १७ एप्रिल रोजी मध्यरात्री बँक ऑफ महाराष्ट्रचे एटीएम फोडण्याचा धाडसी प्रयत्न अज्ञात चोरट्यांनी केला. या घटनेमुळे शहरात पुन्हा एकदा 'चड्डी-बनियान गँग' सक्रिय झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, चोरट्याने एटीएम मशिनचे नुकसान केले असले तरी बँकेची अभेद्य सुरक्षा यंत्रणा भेदण्यात त्याला अपयश आल्याने लाखो रुपयांची रोकड बचावली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १७ एप्रिलच्या मध्यरात्री सुमारास एका अज्ञात चोरट्याने आकाशवाणी परिसरातील बँक ऑफ महाराष्ट्रच्या एटीएम केंद्रात प्रवेश केला. सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसल्यानुसार, हा चोरटा केवळ चड्डी आणि बनियान परिधान केलेल्या अवस्थेत होता. त्याने अतिशय सराईतपणे मशिन तोडण्यासाठी अवजारांचा वापर केला. मात्र, मशिनचे बाह्य कवच तोडल्यानंतर आतील तिजोरी उघडणे त्याला अशक्य झाले. बराच वेळ प्रयत्न केल्यानंतर आणि सुरक्षा अलार्म वाजण्याची भीती वाटल्याने चोरट्याने रिकाम्या हाताने तेथून पलायन केले.

या घटनेचे जे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे, त्यावरून पोलिस तपासाला नवीन दिशा मिळाली आहे. चोरट्याची वेशभूषा पाहता, ही चोरी चड्डी-बनियान गँगनेच करण्याचा प्रयत्न केल्याचा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. ही गँग आपल्या अंगाला तेल लावून आणि कमी कपड्यांमध्ये चोरी करण्यासाठी कुख्यात आहे, जेणेकरून पकडले गेल्यास निसटणे सोपे होईल. शहरातील इतर भागांतही अशा प्रकारची टोळी वावरत असल्याची भीती आता व्यापारी आणि नागरिकांमधून व्यक्त होत आहे. एटीएम मशिनची तोडफोड झाल्याचे निदर्शनास येताच बँक प्रशासनाने पोलिसांना पाचारण केले. याप्रकरणी बँक ऑफ महाराष्ट्र, गारखेडा शाखेचे व्यवस्थापक अभिनव इंगळे यांनी जवाहरनगर पोलिस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे. दरम्यान, यापूर्वी मार्च २०१७ मध्ये, शहरातील सातारा परिसरातील सुधाकर नगर पोलिस हाउसिंग सोसायटीमध्ये या टोळीने दरोडा टाकला होता. विशेष म्हणजे, या सोसायटीत पोलिस कर्मचारी आणि त्यांचे नातेवाईक वास्तव्यास आहेत. चोरांनी येथून लाखो रुपयांचे दागिने आणि रोकड लंपास केली होती. अत्यंत सुरक्षित समजल्या जाणाऱ्या पोलिस वसाहतीतही या टोळीने निर्भयपणे चोरीची ही घटना घडवून आणली होती.

टोळीची कार्यपद्धती कशी?

या टोळीची गुन्हे करण्याची पद्धत अत्यंत वेगळी आहे. टोळीचे सदस्य अनेकदा रात्रीच्या वेळी केवळ चड्डी आणि बनियान परिधान करून येतात. कोणाच्या हाताला लागू नये किंवा पकडले जाऊ नये म्हणून ते आपल्या शरीराला तेल किंवा ग्रीस लावतात. त्यांच्याकडे काठी किंवा चाकू यांसारखी घातक शस्त्रे असतात, ज्याचा वापर ते प्रतिकार करण्यासाठी करतात.

## महाराजस्व शिबिरात १,४३० जणांनीघेतला शासकीय योजनांचा लाभ

घनसावंगी। प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील आंतरवाली टेंभी येथे महसूल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिराचे उद्घाटन आमदार हिकमत उढाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, तहसीलदार रमेश पागोटे, गटविकास अधिकारी प्रदीप कदम, तालुका कृषी अधिकारी डॉ. सखाराम पवळ, गटशिक्ष ाधिकारी रवींद्र जोशी, तालुका आरोग्य अधिकारी रमेश गायकवाड, भूमी अभिलेख अधिकारी शालिनी बिदरकर, दुय्यम निबंधक मनीषा पैठणे, नायब तहसीलदार सोमनाथ तोतला, मंडळ अधिकारी पी. डी. शिंदे उपस्थित होते.



शिबिरात नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग बांधव यांच्या महसुली अडचणींवर मार्गदर्शन करण्यात आले. अनेक प्रकरणांचे तत्काळ निवारण झाले. १४३० नागरिकांनी विविध योजनांचा लाभ घेतला. आमदार उढाण यांनी विविध विभागांच्या स्टॉलला भेट देत माहिती जाणून घेतली. आंतरवाली टेंभी समाधान शिबिरात उपस्थित परिसरातील ग्रामस्थ. प्रलंबित महसूल प्रकरणे निकाली निघाल्याने समाधान शिबिरात सातबारा उतारा, ८ अ उतारा देणे, दुरुस्ती, फेरफार नोंदी, नोंदणी, मंजुरी, जमिनीची मोजणी अर्ज, मालकी हक्क दुरुस्ती, वारस नोंद, जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन-क्रीमी लेयर प्रमाणपत्र, वय प्रमाणपत्र, जन्म दाखला संबंधित सहाय्य देण्यात आले. घरकुल योजना, वृद्धापकाळ पेन्शन योजना, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती योजना, विविध शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज स्वीकारले गेले. प्रलंबित महसूल प्रकरणे सोडवण्यात आली. शेतकऱ्यांना शेतीसाठी उपयुक्त साहित्याचे वाटप करण्यात आले. हार्वेस्टर, ट्रॅक्टर, मिनी ट्रॅक्टर, विविध अवजारे देण्यात आली. आरोग्य, ग्रामविकास आदी विभागांतर्फे अर्ज स्वीकारले गेले. अनेक प्रलंबित प्रकरणे जागीच निकाली काढली. यावेळी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# निळवंडेचे पाणी घराघरात पोहोचवणे हेच माझ्या जीवनाचे ध्येय -थोरात

## राजकारण सत्तेसाठी नव्हे,तर गरिबांच्या जीवनात आनंद निर्माणासाठी



संगमनेर। प्रतिनिधी

''निळवंडे धरण आणि त्याचे कालवे पूर्ण करून दुष्काळी भागातील प्रत्येक शेतकऱ्याच्या शिवारात पाणी पोहोचवणे, हेच माझ्या जीवनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. राजकारण हे सत्तेसाठी नाही, तर गोरगरिबांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी असते, असे प्रतिपादन माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले. संगमनेर तालुका युवक काँग्रेस व एनएसयुआयच्या वतीने आयोजित युवा संगम कार्यक्रमात ते बोलत होते.

आपल्या महाविद्यालयीन आठवणींना उजाळा देताना थोरात म्हणाले, पुण्यात लॉ कॉलेजचे जनरल सेक्रेटरी असताना अनेक आंदोलनांत सहभाग घेतला. मीटर हटाव, टेंभे आंदोलन, मराठवाडा नामांतर आणि निळवंडे पाणी प्रश्नासाठी केलेल्या आंदोलनात ९ दिवसांचा कारावासही भोगला. संघर्ष हा आपल्या पाचवीलाच पुजलेला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. निळवंडे धरणाबाबतचा एक किस्सा सांगताना ते म्हणाले, ''१९९९ मध्ये कॅबिनेट मंत्रिपद मिळत असतानाही निळवंडेचे काम मार्गी लावण्यासाठी मी मुद्दाम राज्यमंत्रिपद मागून घेतले. अनंत अडचणींवर मात करून धरणाची भिंत आणि कालव्यांची कामे पूर्ण केली. आता प्रत्येक शेतकऱ्याला पाणी मिळावे, यासाठी माझा पाठपुरावा सुरू आहे. काही लोक स्वार्थासाठी किंवा ईडीच्या भीतीपोटी पक्ष बदलून गेले आहेत. इतिहास केवळ लढणाऱ्यांचीच नोंद घेतो, पळून जाणाऱ्यांची नाही. नाशिक-पुणे रेल्वे नियोजित मार्गानेच व्हावी यासाठी आपला पाठपुरावा आहे, मात्र तालुक्याची प्रगती रोखण्यासाठी मुद्दाम काही अडचणी निर्माण केल्या जात असल्याची टीका त्यांनी केली. सध्या राजकारणात जातीयता वाढली आहे. सत्ताधाऱ्यांनी राजधर्माचे पालन करणे गरजेचे आहे, मात्र सध्या तसे चित्र दिसत नाही. कार्यक्रमात युवकांनी विचारलेल्या रॅपिड फायर प्रश्नांना थोरातांनी दिलखुलास आणि मिश्किल उत्तरे दिली. आभार संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ. जयश्री थोरात यांनी मानले.प्रसिद्धीसाठी खालच्या पातळीवरील टीका दुर्दैवी ''आमच्या कुटुंबाला वारकरी आणि पुरोगामी विचारांची बैठक आहे. शरद पवार हे यशवंतराव चव्हाण यांच्यानंतरचे मोठे नेतृत्व असून वडीलधाऱ्यांचा मान ठेवून राजकारण झाले पाहिजे. प्रसिद्धीसाठी केली जाणारी खालच्या पातळीवरील टीका दुर्दैवी आहे, असेही थोरात म्हणाले.

## श्रीरामपुरात डॉ. आंबेडकरांचा तीन महिन्यात भव्य पुतळा उभारणार

### भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील

श्रीरामपूर। प्रतिनिधी

श्रीरामपूर श्रीरामपूरच्या जनतेला दिलेला शब्द पाळत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दिमाखात उभा राहिला आहे. आता त्याच निर्धाराने येत्या ३ महिन्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारणार, अशी घोषणा भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा स्मारक समितीच्या वतीने डॉ. विखे पाटील यांना 'समाज भूषण पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले, यावेळी ते बोलत होते.

यावेळी सुभाष त्रिभुवन, दीपक पटारे,बाबासाहेब चिडे, जितेंद्र छाजेड, श्रीनिवास बिहाणी, संजय फंड, नाना शिंदे, वैशाली चव्हाण, संजय गांगड,रवी पाटील, आशिष धनवटे आदी उपस्थित होते. पुतळा उभारणीच्या कामावरून होत असलेल्या राजकारणावर डॉ. विखे पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, यात कोणीही श्रेयावादाची लढाई करू नये. समाज



बांधवांसह आजी-माजी लोकप्रतिनिधींचे नाव घेऊन त्यांचा देखील स्मारक उभारणीत मोठे योगदान आहे. जे काम शिल्लक राहिले आहे, त्यात आमचा खारीचा वाटा असेल. निदान महामानवांना तरी राजकारणाच्या कक्षेबाहेर ठेवा, श्रीरामपुरात उभारले जात असलेले भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक हे केवळ एक पुतळा नसून ती बाबासाहेबांप्रती असलेली आस्था असेल. हा पुतळा असा देखणा आणि भव्य असेल, असेही ते म्हणाले. डॉ. सुजय विखे पाटील यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा स्मारक समितीच्या वतीने समाज भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

cmyk

# अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात आ.धस आक्रमक

## ड्रग्स व गुटखा तस्करीवर कठोर कारवाईची मागणी

धाराशिव । प्रतिनिधी

**धाराशिव जिल्ह्यासह बीड व मराठवाड्यात वाढत चाललेल्या प्रतिबंधित अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात भाजप आमदार सुरेश धस यांनी आक्रमक भूमिका घेतली असून संबंधितांवर मकोका अंतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मुद्दा उपस्थित करून हक्कभंग दाखल करण्याचा इशाराही दिला आहे.**

जिल्ह्यात एमडी ड्रग्ज, गांजा आणि गुटखा यांसारख्या प्रतिबंधित पदार्थांची खुलेआम तस्करी होत असून यामुळे तरुण पिढी नशेच्या आहारी जात असल्याची गंभीर चिंता धस यांनी व्यक्त केली. नळदुर्ग येथे २७ मार्च २०२६ रोजी पोलिसांनी केलेल्या कारवाईत तब्बल ४८ लाख रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला होता. या प्रकरणात ड्रग्ज तस्करीतील फरार आरोपी इंद्रजीतसिंह उर्फ मिटू ठाकूर याने पोलिसांना धमकावल्याची बाब समोर आली असून ती अत्यंत धक्कादायक असल्याचे त्यांनी नमूद केले.



या कारवाईत बीड जिल्ह्यातील संजय सुभाष जगताप (वानेवाडी, ता. पाटोदा), सचिन परमेश्वर पवार (कुसळंब, ता. पाटोदा) आणि सतीश तुकाराम सोंडगे (गवळवाडी, ता. पाटोदा) या तिघांना अटक करण्यात आली आहे. मात्र मुख्य आरोपी अद्याप फरार असल्याने पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

नळदुर्ग व तुळजापूर येथील ड्रग्ज आणि गुटखा तस्करी प्रकरणात मकोका लावावा, अशी मागणी धस यांनी पोलिस अधीक्षक रितु खोकर यांच्याकडे केली होती. तथापि, यावर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. तुळजापूर ड्रग्ज प्रकरणातील आरोपी ठाकूर याला अद्याप अटक न होणे, तसेच पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यात होत असलेला विलंब हा जाणीवपूर्वक असल्याचा आरोप त्यांनी केला.

धाराशिव, बीड, जालना आणि लातूर जिल्ह्यांमध्ये शाळकरी मुले व तरुणांना अमली पदार्थ सहज उपलब्ध होत असल्यामुळे परिस्थिती चिंताजनक बनली आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने तातडीने प्रभावी कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, एकाच ठिकाणी दीर्घकाळ कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची बदली करावी, तसेच तस्करीला संरक्षण देणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही धस यांनी केली आहे.

# बेपत्ता महिलेचा मृतदेह तलावात आढळला

## दोन दिवसापासून शशिकला जाधव होत्या बेपत्ता

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील धोंडीपुरा येथील दोन दिवसापासून बेपत्ता झालेल्या महिलेबाबत दुर्दैवी माहिती समोर आली आहे. सौ. शशिकला अशोक (बाप्पू) जाधव या थिंगळे गल्ली येथे वास्तव्यास होत्या. घरातून बाहेर पडल्यापासून त्यांचा कोणताही संपर्क होत नव्हता, त्यामुळे कुटुंबीय आणि स्थानिक नागरिक त्यांचा शोध घेत होते. परंतु जाधव ह्या मिळून न आल्याने कुटुंबीय नातेवाईक चिंतेत होते.

मात्र, दिनांक २० एप्रिल (सोमवार) रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास त्यांचा मृतदेह घोडका राजुरी तलावात आढळून आला.या घटनेमुळे एकच खळबळ उडाली.शशिकला जाधव या अत्यंत मनमिळावू व प्रेमळ स्वभावाच्या



असल्याने या परिसरात त्यां सर्व परिचित होत्या, परंतु त्या अचानक बेपत्ता झाल्या व तलावात मृतदेह आढळल्याने हळहळ व्यक्त होत असून कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.घटनेची माहिती मिळताच पिंपळनेर पोलिस घटनास्थळी दाखल झाली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमागील कारण मात्र अद्याप स्पष्ट झाले नाही.

# आष्टीच्या अनिशा ग्लोबलमध्ये प्राथमिक धडे गिरविलेल्या उदयराज काटे यांची लेफ्टनंटपदी निवड

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील अनिशा ग्लोबल इंग्लिश स्कूल मध्ये प्राथमिक शिक्षणाचे धडे गिरवल्यानंतर उदयराज विनोद काटे (वय १८) याने राष्ट्रीय संरक्षण अकादमी () परीक्षेत अतुलनीय यश संपादन करून करून लेफ्टनंट पदी मजल मारली आहे सन २०२३ मध्ये त्याने शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण करून लगेचच उच्च माध्यमिक परीक्षा नंतर लक्ष केंद्रित करून सप्टेंबर २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या



राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या माध्यमातून भारत देशातून लाखो विद्यार्थ्यांमधून त्याने अखिल भारतीय पातळीवर १३४ वा रॅन्क प्राप्त केला आहे

यानंतर बेंगलोर येथे झालेल्या मुलाखतीतही त्याने यश मिळवत अंतिम निवड निश्चित केली...अवघ्या १८ व्या वर्षी पहिल्याच प्रयत्नात मिळवलेल्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आष्टी येथील ग्रामसेविका असलेल्या श्रीमती मुक्ता पवार यांचा नातू असलेल्या

उदयराजचा शैक्षणिक प्रवास फिनिक्स इंग्लिश स्कूल, आष्टी येथून सुरू झाला. त्यानंतर त्याने अनिषा ग्लोबल इंग्लिश स्कूल, आर्मी स्कूल नगर आणि सातारा सैनिक स्कूल येथे शिक्षण घेतले.

त्याचे वडील विनोद काटे हे माजी आर्मी जवान असून सध्या मुंबई पोलिसात कार्यरत आहेत. आई यमुना पवार या गृहिणी आहेत. या यशाबद्दल आष्टी येथील अनिषा ग्लोबल इंग्लिश स्कूलमध्ये त्याचा सत्कार करण्यात पान ३ वर

# बीड पोलीसांकडून धडधडणाऱ्या सायलेन्सरचा खेळ खल्लास; बुलेट वाहनधारकांना दिला दणका

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात बुलेट मोटारसायकलच्या सायलेन्सरमधून होणाऱ्या कर्णकर्कश आवाजाविरोधात पोलिसांनी आता जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आक्रमक पवित्रा घेतला आहे. रस्त्यावर धुमाकूळ घालत नागरिकांची झोप उडवणाऱ्या आणि कायद्याची पायमल्ली करणाऱ्या वाहनधारकांवर विशेष दंडात्मक



मोहीम राबवत पोलिसांनी नियम मोडणाऱ्यांचे सायलेन्सर जप्त करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे यावेळी नव्याने रुजु झालेले वाहतुक शाखेचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीपकुमार खेडकर यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हवालदार अजिनाथ मुंडे, पोलीस चालक संतोष हारके, पोलीस हवालदार राहुल गायकवाड, पोलीस अंमलदार मोहन बनसोडे, संतोष मोरे, शेषनारायण गाडे, पोलीस चालक अंमलदार नारायण वाघमारे उपस्थित होते.

सदरील कारवाई ही दि.१८ एप्रिल पान ३ वर

# बोरखेड येथे विविध प्रकारच्या झाडाची सर्रास तोड

## वनविभागाच्या अधिकाऱ्यांचे कमालीचे दुर्लक्ष

चौसाळा । प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या मोजे बोरखेड तालुका बीड येथे व परिसरात शेतकऱ्यांच्या बेकायदेशीर वृक्षतोडीकडे कोणाचेच लक्ष नसल्याने सदर हे प्रकार वरचेवर वाढत जात आहे तरी या प्रकरणी वन क्षेत्र अधिकारी बीड यांनी त्वरित आळा घालून वृक्षतोड थांबवावी अशी नागरिकांची मागणी आहे



बोरखेड तालुका बीड येथील विष्णू भिकाराम सर्वज्ञ या शेतकऱ्याचे मालकी हक्कातील असणारे जुने झाडे त्याचबरोबर इतरही झाडे कसलीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे तोडून विक्री केले सदर प्रकरणी शेतकरी विष्णू सर्वज्ञ यांनी संबंधित झाडे तोडणारे बांधाच्या शेजारील शेतकरी दत्तात्रय बापूराव बोर्डे यांनी चौसाळातील एका व्यापाऱ्याच्या मदतीने तोडून त्याची विल्हेवाट लावली आहे.विष्णु सर्वज्ञ यांनी नेकनूर पोलीस स्टेशन येथे सदर आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली असून गुन्हा नोंद केला आहे सदर तक्रारीच्या प्रती मा. तहसीलदार बीड तसेच वनक्षेत्र अधिकारी वन विभाग कार्यालय बीड यांच्याकडे केले आहे.

# पाच हजाराची लाच घेताना ग्रामसेवकाला रंगेहाथ पकडले

बीड । प्रतिनिधी

लाचखोरीच्या घटना जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तलवाडा येथील ग्रामसेवक सोपान मुसळे याला पाच हजार रुपयांची लाच घेताना जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तक्रारदाराकडून चालू पीटीआर देण्यासाठी मुसळे यांनी सुरुवातीला १० हजार रुपयांची लाच मागितली होती. मात्र तडजोडीनंतर ५ हजार रुपयांवर व्यवहार ठरला. याबाबत तक्रारदाराने जालना एसीबीकडे तक्रार दाखल केली होती.त्यानुसार, सोमवारी (दि. २०) गेवराई येथील कार्यालयात सापळा रचून कारवाई करण्यात आली. यावेळी मुसळे हे तक्रारदाराकडून ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीच्या पथकाने रंगेहात पकडले.

ही कारवाई जालना एसीबीचे उपअधीक्षक बाळासाहेब जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. दरम्यान, या प्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# अनुसूचित जातीच्या वर्गीकरणाला चर्मकार समाजाचा विरोध

बीड । प्रतिनिधी

केंद्र व राज्य सरकारने अनुसूचित जातीच्या वर्गीकरणाचा घाट घातला जात आहे अनुसूचित जातीमध्ये एकूण ५९ समाविष्ट करण्यात आले आहेत जातीमध्ये अ ब क ड असे वर्गीकरण करण्याचा घाट घातला आहे मात्र याच्या विरोधामध्ये चर्मकार समाज आक्रमक झाल्याच्या पहावयास मिळत आहे.काय म्हणतात आंदोलक आपण पाहूया...

केंद्र व राज्य सरकारने अनुसूचित जाती च्या



वर्गीकरणाचा जो घाट घातला आहे त्याला आमचा तीव्र विरोध आहे यामुळे जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करण्याचं काम सरकार करत आहे यामध्ये काही जातीचा विकास कमी जास्त प्रमाणात जरी झाला असला तरी आम्ही गुन्ह्या गोविंदाने या ठिकाणी नांदत आहोत. सरकारने हा घेतलेला निर्णय पान ३ वर

# बीडमध्ये उसळला भीमसागर!

## आनंद शिंदेंच्या भीम गीतांत न्हाऊन निघाले बीडकर

बीड । प्रतिनिधी

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या संयुक्त जयंती निमित्त रविवारी झालेल्या आनंद शिंदे यांच्या भीम गीतांच्या कार्यक्रमास भीमसागर उसळला. यावेळी आनंद शिंदेंनी सादर केलेल्या भीम गीतांत बीडकर न्हाऊन निघाले.

बीडचे आ. संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली रविवारी महामानव डॉ. बाबासाहेब



आंबेडकर व महात्मा फुले यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. दरम्यान सायंकाळी बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे ख्यातनाम लोकगायक आनंद शिंदे यांचा भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास बीड शहर व परिसरातील भीम सैनिकांनी अलोट गर्दी केली. यावेळी भगवान पान ३ वर

# ज्येष्ठ शिक्षक, पत्रकार मधुकर सरपते यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

मादळमोही येथील रहिवासी तसेच ज्येष्ठ शिक्षक, पत्रकार आणि स्काऊट चळवळीतील मार्गदर्शक मधुकर अप्पाराव सरपते यांचे दिनांक १५ एप्रिल २०२६, बुधवार रोजी पहाटे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने मादळमोहीसह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून शिक्षण, सामाजिक व स्काऊट क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

मधुकर सरपते यांनी जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई येथे शिक्षक म्हणून कार्य करत असतानाच पत्रकारितेतही सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांनी आपल्या लेखणीतून समाजातील विविध



प्रश्नांना वाचा फोडत जनजागृती केली. मात्र त्यांची खरी ओळख स्काऊट चळवळीतील निष्ठावंत, कर्तव्यदक्ष आणि प्रेरणादायी मार्गदर्शक अशीच होती. स्काऊट चळवळीत त्यांनी आयुष्यभर निस्वार्थी सेवा दिली. जिल्हा मेळाव्यांमध्ये स्वतः पहाटे उठून साधेपणाने दिनक्रम पार पाडत असताना इतरांसाठी मात्र उत्तम सोयी उपलब्ध करून देण्याची त्यांची वृत्ती सर्वांसाठी आदर्श ठरली. भोजन समिती प्रमुख म्हणून त्यांनी प्रत्येकाला वेळेवर चहा, नाश्ता आणि जेवण मिळावे यासाठी घेतलेली मेहनत आजही अनेकांच्या स्मरणात आहे. त्यांच्या परिश्रमशील वृत्तीची प्रचिती त्यांच्या दैनंदिन जीवनातूनही दिसून येत होती. वयाची पर्वा न करता मादळमोही ते पाडळसिंगी असा पायी प्रवास करून वर्तमानपत्र आणण्याची त्यांची जिद्द तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरली. समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी 'श्रावण बाळ' योजनेअंतर्गत केलेले प्रयत्नही उल्लेखनीय होते. शिक्षक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवले, तर पत्रकार म्हणून समाजातील प्रश्नांना वाचा फोडली. शिस्तप्रियता, प्रामाणिकपणा, हसतमुख स्वभाव आणि सेवाभाव हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख होती. त्यांच्या जाण्याने केवळ कुटुंबीयांचेच नव्हे, तर संपूर्ण शिक्षण, सामाजिक आणि स्काऊट क्षेत्राचे मोठे नुकसान झाले आहे, अशा पान ३ वर

# बीड येथिल कृषी प्रदर्शनाची जय्यत तयारी ; विविध समित्यांचे गठण

## स्वागताध्यक्षपदी दिलीप गोरे तर कार्याध्यक्षपदी कृषीभूषण शिवराम घोडके

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. दरवर्षी गेवराई येथे सातत्याने होणारे हे प्रदर्शन या वर्षी प्रथमच बीड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव दुसऱ्यांदा दिनांक ०१ मे ते ०५ मे दरम्यान किसान कृषी महोत्सव या द्वारे छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण ( मल्टीपर्पज ग्राउंड ) या मैदानात भव्य अशा ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. प्रदर्शन जय्यत तयारी सुरू असून या अनुषंगाने



विविध समित्यांचे गठन करण्यात आले. गेवराई चे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून व संपादक दिलीप खिस्ती, संपादक शेख तय्यब, संपादक गंमत भाऊ भंडारी, संपादक संतोष मानूरकर, वसंत मुडे, बालाजी मारगुडे, गणेश सावंत, मनमोहन कलंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाचे आयोजन केले असून स्वागताध्यक्षपदी दिलीपराव गोरे कार्याध्यक्षपदी कृषीभूषण शिवराम घोडके यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे मुख संयोजक कृषिभूषण महेश बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

मराठवाड्यातील शेतकर्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान मराठवाडाभर बीड, जालना, परभणी, हिंगोली सह इतर ठिकाणी या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करते बीड जिल्ह्यातील शेतकर्यांच्या आग्रहाने पुन्हा या प्रदर्शनाचे बीड येथे आयोजन केले असून प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन,ओंकार साखर कारखाना, ऑल इंडिया ॲग्रो इनपुट डीलर असोसिएशन यांचा यात विशेष सहभाग प्रदर्शनात असणार आहे. कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ पान ३ वर

# सिरसमार्ग येथील संतुआई देवीच्या तीन दिवशीय यात्रेला आजपासून सुरुवात

सिरसमार्ग । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथील ग्रामदैवत श्री क्षेत्र सुभान संतुआई देवीची यात्रा मंगळवारपासून सुरू होत असून, यात्रे निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांनी या यात्रोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन यात्रा कमिटीने केले आहे.

गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथील ग्रामदैवत श्री क्षेत्र सुभान संतुआई देवीच्या यात्रेला मंगळवारपासून सुरुवात होत आहे. रविवारी अक्षय्य तृतीया यादिवशी सिरसमार्ग व परिसरातील भाविक श्रीक्षेत्र राक्षसभुवन या ठिकाणी गोदावरी नदीचे पाणी आणण्यासाठी कावडी घेऊन पायी जातात. दि.२१ एप्रिल रोजी सकाळी संतुआई देवी सह गावातील देव देवतांचा जलाभिषेक केला जाणार आहे. गावांमध्ये कावडीची ढोल ताशा च्या संवाद्या वाजून



**छबीना, कुस्त्यांचा आखाडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन**

जल्लोषात मिरवणूक काढली जाणार आहे. सायंकाळी देवीच्या पालखीची मिरवणूक( छबीना) काढण्यात येणार आहे. दि.२२ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता संतुआई देवीच्या परिसरात कुस्त्याचां आखाडा भरविण्यात येणार आहे. मराठवाड्यातल्या नामांकित पहेलवान या ठिकाणी कुस्ती खेळतात आणि सर्वांना बक्षीस वितरण केले जाते.

दि.२३ एप्रिल रोजी सायंकाळी समर्थ शाळेच्या मैदानावर सुपर धमाका मराठी हिंदी सिनेमांच्या गाण्यांचा बहारदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. संतुआई देवीच्या यात्रेच्या निमित्ताने ठेवलेल्या कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घेण्यांत यावा असे आवाहन संतुआई यात्रा उत्सव समिती व सिरसमार्ग ग्रामस्थाच्या वतीने करण्यात आले आहे .

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

मंगळवार दि.२१ एप्रिल २०२६ । पान ७

# छोटा वारकरीने मारली बाजी! महाराष्ट्राच्या वारकरी परंपरेचा जागतिक गौरव



**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राची समृद्ध वारकरी परंपरा आणि २१ व्या शतकातील प्रगत 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (-ख) यांचा एक अभूतपूर्व संगम सध्या तंत्रज्ञान विश्वात चर्चेचा विषय ठरत आहे. या क्षेत्रातील नाविन्यपूर्ण प्रयोगासाठी पुण्याच्या वारीव्हर्स स्टुडिओज या स्टार्टअपने 'मास्टर्स युनियन नेक्स्ट टेक १.० एआय शिखर परिषद २०२६' मध्ये मानाचा क्रिएटिव्ह एआय लुमिनरी अवॉर्ड २०२६' पटकावला आहे.

वारीव्हर्स स्टुडिओजचे संस्थापक स्वप्नील मोरे आणि सह-संस्थापक पूजा मोरे यांना या जागतिक स्तरावरील व्यासपीठावर सन्मानित करण्यात आले. या स्टार्टअपच्या छोटा वारकरी (उहर्होंर तरीज्ञरीळ) या उपक्रमाने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. शतकानुशतके चालत आलेली अभंगवाणी, संतांचे विचार आणि वारकरी संस्कार नव्या पिढीला समजेल अशा रंजक भाषेत मांडण्यासाठी त्यांनी एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. काही दिवसाआधी महाराष्ट्राची समृद्ध वारकरी परंपरा आणि संतांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी एका आधुनिक उपक्रमाचा श्रीगणेशा झाला होता. राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी छोटा वारकरी या अभिनव निमेशन कॅरेक्टरचे अधिकृत उद्घाटन अत्यंत उत्साहात पार पडले. या यशाबद्दल बोलताना संस्थापक स्वप्नील मोरे म्हणाले, हा सन्मान केवळ आमचा नसून संपूर्ण वारकरी परंपरेचा आहे. 'याचा धरीन अभिमान, करीन आपुले जतन' या उक्तीप्रमाणे, आमची संस्कृती जागतिक स्तरावर नेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. एआय हे केवळ साधन नसून ते भविष्यातील संवादाचे सशक्त माध्यम आहे. सह-संस्थापक पूजा मोरे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, छोटा वारकरी हा आमच्यासाठी केवळ एक प्रोजेक्ट नसून तो एक भावनिक प्रवास आहे. या पुरस्कारामुळे आम्हाला अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे. मीडिया आणि एंटरटेनमेंट क्षेत्रात कार्यरत असलेल्या वारीव्हर्स स्टुडिओजला भारत सरकारच्या स्टार्टअप इंडिया उपक्रमांतर्गत मान्यता मिळाली आहे. भारतीय सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी तंत्रज्ञानाचा असा वापर हे आत्मनिर्भर भारताच्या दिशेने पडलेले एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. या पुरस्कारामुळे केवळ महाराष्ट्राच्या नव्हे, तर भारताच्या सांस्कृतिक वैभवाचा डंका जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात वाजला आहे. पारंपारिक भक्ती मार्ग आता डिजिटल युगात 'स्मार्ट' पद्धतीने प्रवाहित होत आहे, हेच या यशाने सिद्ध केले आहे.

काय आहे छोटा वारकरी संकल्पना? गेल्या १५ वर्षांपासून 'फेसबुक दिंडी' (ऋरलशलेज्ञ ऊळपवळ) व 'व्हर्च्युअल दिंडी'च्या माध्यमातून वारीचा प्रचार करणारे स्वप्नील मोरे यांनी या संकल्पनेची निर्मिती केली आहे. याच पिढीला आपल्या मुळांशी जोडण्यासाठी 'छोटा वारकरी' या पात्राची निर्मिती करण्यात आली आहे. एआय आधारित कथाकथन, ॲनिमेशन आणि डिजिटल मीडियाच्या माध्यमातून लहान मुलांवर आध्यात्मिक व नैतिक संस्कार करण्याचे कार्य हे स्टार्टअप करत आहे. केवळ मनोरंजन नाही, तर मूल्यांची जोपासना हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

# लोणीकाळभोर परिसरात दहशत माजविणाऱ्या दोघांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

लोणीकाळभोर परिसरातील माईलस्स्टोन हॉटेलजवळ दहशत माजवणाऱ्या दोन सराईत आरोपींना खंडणी विरोधी पथक २, गुन्हे शाखा, पुणे शहर (झ्रींपिश उीळाश) यांनी धाडसी कारवाई करत शस्त्रांसह अटक केली आहे. या कारवाईमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांवर पोलिसांनी वचक बसवला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. १८ एप्रिल ते २४ एप्रिल २०२६ या कालावधीत अवैध अग्निशस्त्र व शस्त्र जप्तीविरोधात विशेष मोहीम राबविण्याचे आदेश वरिष्ठांकडून देण्यात आले होते. त्यानुसार खंडणी विरोधी पथक २ चे अधिकारी



व अंमलदार मांजरी पोलीस ठाण्याच्या (झ्रींपिश उीळाश) हद्दीत गस्त घालत असताना पोलीस अंमलदार नितीन मुंढे यांना गोपनीय माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारे लोणी काळभोर गुन्हा रजिस्टर क्रमांक १६६/२०२६ (भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), ३५२, ३५१(२)(३), ३(५) व महाराष्ट्र पोलीस क्ट कलम ३७(१) सह १३५) मधील फरार आरोपी प्रणवराज सुनील यादव (वय २५, रा. मांजरी बुद्रुक, पुणे) व त्याचा साथीदार जय गणेश शेलार (वय २५, रा. हडपसर, पुणे) हे मांजरी ग्रीन ॲनेक्स परिसरात धारदार शस्त्रांसह असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक राम राजमाने यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तत्काळ सापळा रचून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून दोन लोखंडी तलवारी, दोन सुरे आणि एक कोयता असा एकूण सुमारे ३,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी मांजरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई (झ्रींपिश उीळाश) पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त पंकज देशमुख, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) निखील पिंगळे आणि सह पोलीस आयुक्त (गुन्हे २) राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सदर कामगिरीत पोलीस निरीक्षक राम राजमाने, पोलीस उपनिरीक्षक गौरव देव, नितीन मुंढे, कानिफनाथ कारखीले, पोलीस हवालदार घावटे, कुसाळकर, आढारी, महाजन, राऊत, शेख, परीट, राक्षे तसेच पोलीस शिपाई पाटील, खराडे, खरात आणि शिंदे यांनी सहभाग घेतला.

# पोलीस दलात खळबळ! निवृत्त एसीपीकडून अडीच कोटींचा गंडा; जिवंत मालकाला 'मृत' घोषित करून व्यावसायिकाला फसवलं

**पुणे । प्रतिनिधी**

जमीन खरेदीत मोठा फायदा करून देण्याच्या बहाण्याने एका निवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्ताने व्यावसायिकाची तब्बल २ कोटी ४० लाखांची फसवणूक केली आहे. तसेच एका व्यक्तीच्या नावाने खोटे बँक खाते उघडून आणि बनावट कंपनीच्या नावाने व्यवहार करून रक्कम उकळल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी त्यांची पत्नी, मुलासह पाचजणांविरुद्ध चतुश्रृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

सुशिल शंकरराव कदम, नंदा कदम, अनिकेत कदम (तिघेही रा. तळवलकर जिमसमोर, फर्ग्युसन रस्ता), दत्ता केदारी (रा. बोरज, जि. पुणे) आणि बाळासाहेब आर. वाळुंज (रा. कामशेत, ता. मावळ) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहेत. अभिजीत विलास उंद्रे (वय ३५, रा. मांजरी खुर्द) यांनी तक्रार दिली आहे. ही घटना डिसेंबर २०१६ ते २१ मे २०२५ या कालावधीतील आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, सुशिल कदम हे पुणे पोलीस दलातून सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणून निवृत्त झाले आहे.

तक्रारदार हे व्यावसायिक आहेत. कदम यांनी मुंबईतील बालकिशन गुप्ता यांची खेड तालुक्यातील बोरज येथे मोक्याच्या ठिकाणी १२ एकर जमीन असून ती विक्रीसाठी




असल्याचे तक्रादारांना सांगितले. या जमिनीत गुंतवणूक केल्यास मोठा आर्थिक फायदा होईल, असे आमिष दाखवले. तक्रारदारांकडील रक्कम स्वीकारण्यासाठी बालकिशन गुप्ता यांच्या नावाने खोटे बँक खाते उघडले आणि तक्रारदारांकडून ५० लाखांची पे-ऑर्डर घेतली. तसेच सोलापूर येथील एका बँकेत रिस्टोन मल्टीकेअर प्रा. लि. या नावाने बनावट खाते उघडून त्यामध्ये २५ लाख आरटीजीएसद्वारे जमा करण्यास भाग पाडले.

त्यानंतर विविध कारणांनी तक्रारदारांकडून आणखी ३० लाख घेतले. याचबरोबर खरेदीखत करायचे असल्याचे सांगून १ कोटी ३५ लाख रोख स्वीकारले. त्यानंतर जमीनमालक बालकिशन गुप्ता हे जिवंत असतानाही ते मयत झाल्याचे सांगून व्यवहार पुढे ढकलण्यात आला. त्यामुळे तक्रारदार उंद्रे यांनी पैसे परत मागितले असता आरोपींनी टाळाटाळ केली. तसेच पैसे मागण्यासाठी वारंवार गेल्यास गायब करण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. याचा तपास पोलिस उपनिरीक्षक जाधव करत आहेत. सुशिल कदम यांची पत्नी नंदा कदम आणि मुलगा अनिकेत कदम यांच्या बँक खात्यावर फसवणुकीतील काही रक्कम पाठविण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. तसेच दत्ता केदारी आणि बाळासाहेब वाळुंज हे या व्यवहारात मध्यस्थ म्हणून काम करत असल्याने त्यांच्यावरही गुन्हा दाखल केला आहे.

# वॅलेंटिना इंडस्ट्रीजवर आर्थिक गुन्हे शाखेची रेड; २ हजार लोकांचे ४३ कोटी धोक्यात

**पुणे । प्रतिनिधी**

महिन्याला १ ते ५ टक्के व्याज देण्याचे आमिष दाखवून सामान्य नागरिकांसह अनेक गुंतवणूकदारांची कोट्यवधींची फसवणूक केल्याप्रकरणी वॅलेंटिना इंडस्ट्रीजच्या दोन जणांविरोधात अलंकार पोलिसांत शनिवारी दुपारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अनुषंगाने त्यांच्या कार्यालयावर, तसेच निवासस्थानी आर्थिक गुन्हे शाखेकडून छापेमारी करत झाडाझडती घेऊन महत्त्वाची कादपत्रे जप्त करण्यात आली आहेत.

याप्रकरणी वॅलेंटिना इंडस्ट्रीजचे संतोष बांदल आणि ज्ञानेश्वर अनंत चोरगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आर्थिक गुन्हे शाखेकडे आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अलंकार पोलीस ठाण्यात हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वॅलेंटिना इंडस्ट्रीजचे कार्यालय कर्वे रोड परिसरातील सक्सेस स्केअर इमारतीत आहे. आरोपींपैकी एक जण सॅलिसबरी पार्क, तर दुसरा बिबवेवाडी परिसरात राहतो. आरोपींनी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी विविध गुंतवणूक योजना तयार केल्या होत्या

या योजनांमध्ये कागदोपत्री १ टक्का, तर प्रत्यक्षात ५ टक्के परतावा देण्याचे खोटे आमिष दाखवण्यात आले होते. गुंतवणूकदारांना प्रलोभन देऊन आरोपींनी तब्बल ४३ कोटी २० लाख रुपयांच्या ठेवी स्वीकारल्या. त्यानंतर गुंतवणूकदारांना परतावा व मुद्दल देणे बंद केल्याने काहींनी आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार दाखल केली. हा सर्व प्रकार जुलै २०२२ ते एप्रिल २०२६ या कालावधीत घडला. याप्रकरणी शासनातर्फे अनियमित (अनधिकृत) ठेवी योजना बंदी कायदा, २०१९ च्या कलम २१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे.



# पुण्यातील २ वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची बदली

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील पोलिस प्रशासनात महत्त्वाच्या बदल्या जाहीर करण्यात आल्या असून, पुणे शहर गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे यांची सातारा जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे सातारा जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या बळकटीकरणाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पिंगळे यांनी पुणे गुन्हे शाखेत कार्यरत असताना अनेक गंभीर गुन्ह्यांचा तपास करून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. संघटित गुन्हेगारीविरोधातील कारवायांमध्ये त्यांचा ठसा उमटला असून, त्यांच्या अनुभवाचा फायदा साताऱ्यातील पोलिस यंत्रणेला होणार आहे. दरम्यान, पुणे शहरातीलच पोलिस उपायुक्त राजकुमार शिंदे यांची वाशीम जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकपदी नियुक्ती (ढीरपीषशीी ेष खझड जषषळलशी) करण्यात आली आहे. शिंदे यांनीही विविध विभागांत काम करताना कायदा व सुव्यवस्था राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

# कर्जाच्या नादात महिलेला २८ लाखांचा चुना; २१ तोळे सोने घेऊन भामटा पसार

**पुणे । प्रतिनिधी**

हडपसर परिसरात सोन्याच्या कर्जाच्या आमिषाने एका महिलेची तब्बल २८ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी सध्या फरार आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आयेशा मशीद परिसरात राहणाऱ्या फिर्यादी महिलेने वैद्यकीय अडचणीमुळे आर्थिक गरज भागवण्यासाठी जून २०२५ मध्ये २१ तोळे सोने मॅग फायनान्स येथे गहाण ठेवून सुमारे ११ लाख ५१ हजारांचे कर्ज घेतले होते. दरम्यान,




अतिरिक्त कर्जाची गरज भासल्याने संबंधित फायनान्स कंपनीतील कर्मचारीने मोहसीन मंजूर आलम पठाण नावाच्या व्यक्तीचा संपर्क दिला. सदर आरोपीने कमी व्याजदरात अधिक कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवत फिर्यादीचा विश्वास संपादन केला. २९ सप्टेंबर २०२५ रोजी आरोपीने फिर्यादीला घोरपडी येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत बोलावून घेतले. तेथे त्याच्या साथीदाराच्या खात्यातून फिर्यादीच्या खात्यावर १३ लाख ७२ हजार रुपये जमा करण्यात आले. यानंतर फिर्यादीने आधीचे कर्ज फेडून मॅग फायनान्सकडील २१ तोळे सोने परत घेतले आणि तेच सोने आरोपी मोहसीन पठाण याच्याकडे दिले. आरोपीने ते सोने त्याच्या 'ईश्वरकृपा मल्टीपर्पज निधी लिमिटेड' या संस्थेत तारण ठेवले असल्याचे भासवले. मात्र, काही दिवसांनी संबंधित संस्थेचा पत्ता बनावट असल्याचे समोर आले. तसेच आरोपीने फिर्यादीचे फोन घेणे बंद केले. वारंवार पाठपुरावा करूनही सोने परत न मिळाल्याने अखेर फिर्यादीने पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणात आरोपी मोहसीन पठाण याने १९०.१७ ग्रॅम वजनाचे सुमारे २८ लाख ५० हजाराचे रुपये किमतीचे सोन्याचे दागिने अपहार करून विश्वासघात केल्याचे समोर आले आहे. हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक राघवेंद्र सलगर हे पुढील तपास करीत आहेत. आरोपीचा शोध सुरू आहे.

# अजित दादांच्या तपासाला दिरंगाई का? मुख्यमंत्र्यांनाच विचारलं पाहिजे, अमोल मिटकरींचा सरकारला घराचा आहेर, तर रोहित पवारांचा थेट इशारा

बारामती

अजितदादा पवार यांच्या अपघाती मृत्यूबाबत (-क्षळीं झुरी ऊशरींह छशुी) सरकारने दहा मे पर्यंत भूमिका स्पष्ट करावी. तसेच दोषींवर कारवाई करावी. अन्यथा सरकारला हे महागात पडणार, असा इशारा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार (ठेहळीं झुरी) यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे. तर दुसरीकडे अजित पवारांच्या(-क्षळीं झुरी) अपघाताचा तपास करायला सरकार खूप दिरंगाई करत आहे. ही दिरंगाई का करत आहे, हे मुख्यमंत्र्यांना विचारायला पाहिजे. असं म्हणत अमोल मिटकरी यांनी सरकारलाच घरचा आहेर दिलाय.

ज्या पद्धतीने खरात



प्रकरणाचा तपास केला जातो त्या पद्धतीने अजित पवारांच्या अपघाताचा तपास का केला जात नाही? की सरकारलाच याचा तपास करायचा नाही, हे एकदा स्पष्ट करावे. असे मत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी यांनी केला आहे. अजित दादांसारखा इतका मोठा नेता आपल्यातून निघून जातो आणि एक एफआयआर होऊ शकत नाही? असं म्हणत अमोल मिटकरी यांनी सरकारवर निशाणा साधला आहे. अजित पवारांचा तपास व्हावा यासाठी जनआंदोलन उभा करणार असल्याचंही अमोल मिटकरी म्हणालेत. तसेच रोहित पवार यांनी प्रचारादरम्यान भाजपवर निशाणा साधला, यावर देखील भाष्य त्यांनी केलंय. सुनेत्रा पवारांच्या प्रचारासाठी आमदार अमोल मिटकरी बारामतीत आले असता त्यांनी या प्रकरणावर भाष्य करत प्रतिक्रिया दिली आहे. सुनेत्रा पवारांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महायुतीतील इतर नेते उपस्थित होते. उद्या सांगता सभेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित असणार आहेत. जोपर्यंत अजित पवार हयात होते तोपर्यंत अजित पवार जरी भाजपसोबत गेले तरी अजित पवारांनी भाजप नेत्यांना बारामतीत हस्तक्षेप करू दिला नाही. भाजप नेत्यांना कधीही बारामतीत प्रचाराच्या सांगता सभेला येऊ दिल नाही. मात्र, उद्या देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीची सांगता सभा पार पडणार असल्याचे ही मिटकरी म्हणाले.

# पुण्यात सायबर फसवणुकीचे ८ गुन्हे; तब्बल १.६९ कोटींचा गंडा

पुणे: शहरात आठ वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये १ कोटी ६९ लाख ७५ हजार ४४९ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी संबंधित पोलिस ठाण्यात सायबर चोरांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. वाघोली परिसरातील एका ४१ वर्षीय तक्रारदाराला सायबर चोरांनी १६ एप्रिल ते २६ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत शेअर मार्केटच्या नावाखाली ५३ लाख ३० हजार १८० रुपयांनी फसवल्याची घटना घडली.

धनकवडी येथील ५३ वर्षीय तक्रारदाराला सायबर चोरांनी २६ फेबुवारी २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत इन्शुरन्स कंपनीत अडकलेले पैसे परत मिळवून देतो सांगत १८ लाख ३७३५२ रुपयांना फसवले. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.आनंदनगर, सिंहगड रोड येथील ३५ वर्षीय तक्रारदाराला सायबर चोरांनी २ ते १५ एप्रिल २०२६ दरम्यान तुमच्या बँक खात्यातून मनी लॉंड्रिंगचे ट्रान्झेक्शन झाले असून, पोलिस तपासात मदत करण्यास सांगत ३९ लाखांची फसवणूक केली. याप्रकरणी



सिंहगड रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.विद्यापीठातील हॉस्टेलमधील एका २८ वर्षीय तरुणाची सायबर चोरांनी ९ नोव्हेंबर २०२५ रोजी इन्व्हेस्टमेंट खाते तयार करण्याची थाप मारून २ लाख ५९ हजारांची फसवणूक केली. याप्रकरणी चतु:श्रृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.घोरपडी गाव येथील ४६ वर्षीय तक्रारदाराची सायबर चोरांनी २९ ऑगस्ट ते २६ ऑक्टोबर २०२५ दरम्यान शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली ४ लाख ५५७५० रुपयांची फसवणूक केली. मुंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

खराडी येथील ७१ वर्षीय ज्येष्ठाची सायबर चोरांनी २ सप्टेंबर ते १६ नोव्हेंबर २०२४ यादरम्यान शेअर ट्रेडिंगच्या नावाखाली ६ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी खराडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. धानोरीत ६५ वर्षीय ज्येष्ठाची सायबर चोरांनी २६ ते २९ मार्च २०२५ या काळात मनी लॉंड्रिंगचे ट्रान्झेक्शन तुमच्या बँक खात्यातून झाल्याचे सांगत ७ लाख २३ हजारांची फसवणूक केली. लोहगाव पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला.

cmyk